# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७६**


MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक १ / डिसेंबर २००३



## संपादकीय

## पहाटचिमणी आणि ओंजळभर दाणे

पुन्हा एकदा क्षितिजावर डिसेंबर महिन्याचा चेहरा धारण करणारा सूर्य उगवेल-मावळत राहील, महिनाभर. सरत्या वर्षभरात काय काय घडलं, त्यातलं आशादायी किती, अस्वस्थ करणारं किती, याची जंत्री सर्वत्र वाचली जाईल. किती अपघात झाले, किती माणसं मेली, कोणकोणती कर्तृत्ववान अस्तित्वं अगम्य अशा काळात अस्तंगत झाली या हिशेबांची आकडेवारी असणारे लेख छापले जातील, चर्चा घडतील. नि:श्वसित संध्याकाळी डिसेंबरचा एक एक दिवस मावळत राहील. या सर्व गर्दीत आकडे पेंढा भरल्या जनावरासारखे, अजूनही आलेख उंचावत आहेत. प्रगतीचा 'सेन्सेक्स' वाढतो आहे असं भासवत रहातील. भाषा वापरतांना अधेमध्ये आकडे वापरले की 'किती छान... ' वाटतं आणि सरावाप्रमाणे पुन्हा एकदा 'हॅपी न्यू इअर'च्या ध्वनी प्रतिध्वनीत हरवून जायला आपण मोकळे होतो.

या सर्व सरकलेपणात, सरकल्यागत भास करून देणाऱ्या प्रवासात काही प्रश्न मला मनात तसेच, समुद्रकिनाऱ्यावर दोऱ्यांना टांगलेली 'मच्छी' जशी कायम तशीच दिसते, तसे अगदी चिरयौवनाचे वर असणारे, प्रश्न वाचायचे, ऐकायचे... 'अरे, हो खरंच की' म्हणत गुदमरल्यासारखे वाटून घ्यायचं. मग भारत माझा वाटतो व मी ही भारतीय असल्यासारखे वाटते. पहायचे आहेत असे काही सनातन प्रश्न तर पहा आठवून

? - 'भ्रष्टाचार निपटून काढायलाच हवा' असे म्हणणाऱ्यांच्या देशात असे म्हणणाराही भ्रष्टाचारीच असतो. हे कसे?

?- 'जाती, पोटजातींचा बाऊ नको' असे म्हणणारेच या पडद्याआड उभे राहून दिल्ली गाठतात किंवा गल्ली पेटवतात हे कसे ?

?- काश्मीरचा प्रश्न काय आहे हे सर्वांनाच माहती आहे. 'तो सुटण्यासाठी वाटेल ते करायला हवे' असे वक्तव्य वाटेल ते नेते करतात. तरीही हा प्रश्न प्रश्नच आहे. हे कसे ?

? - शिक्षण, पत्रकारिता, वैद्यक इ. पारंपारिक व्यवसाय 'पवित्र' आहेत असे म्हणणारेच परंपरेला सोडून धंदा करतात, हे कसे?

? - महिलांवरील अत्याचारावर भाषणे ठोकणारे नेते (अगदी महिलासुद्धा) 'वार संस्कृती तुला सलाम' म्हणत संस्कृतीचे पवाडे गातात, हे कसे ?

? - 'प्रीती मिळेल का हो बाजारी' या शीर्षकाची एक कविता पूर्वी वाचली होती. 'प्रीती'च्या जागी 'नीती' शब्द टाकला तर?

? - माणसाला किती लागतं ? याची मर्यादा असायला हवी हे माहीत असणारी 'संत' माणसेही 'माझं माझं', 'मी मी' करतात - हे कसे ?

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक १ / डिसेंबर २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री गुरुदेव दत्त ! | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | अभ्यासक्रमावरील शिक्षण प्रशिक्षणाची अनिवार्यता, वारंवारिता आणि मर्यादा | शिल्पा महाजन | ८ |
| ३) | मनाच्या श्लोकांवरील संग्राह्य ग्रंथ | ह. श्री. परांजपे | ९ |
| ४) | आला संतांचा मेळा | प्रा. मोहन पाठक | ११ |
| ५ ) | २७ व्या राजस्तरीय अर्थपरिषदेची संग्राह्य स्मरणिका | संदीप वळे | १२ |
| ६) | युवा वर्ग आणि सामाजिक बांधिलकी | स्नेहल संजीव मुळे | १५ |
| ७) | राजकीय अराजकता : धार्मिक की आर्थिक | मानसी मधुकर मुळीक | १८ |
| ८) | प्रवास | सौ. आरती रा. कुलकर्णी | २० |
| ९) | मरावे परी कीर्तीरूपे उरावे | आशा भिडे | २३ |
| १०) | पुस्तक परिचय | स्मृती म जोशी | २७ |
| ११) | स्त्री स्वातंत्र्य : किती खरे ? किती खोटे ? | गीतेश ग. शिंदे | २९ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

('संपादकीय' मुखपृष्ठावरून)

न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी अधिक घट्ट आवळली जाते आहे. आधीच अंध, त्यातून पट्टी म्हणजे प्रकाशाचा किरणही आशेचे संदेश घेऊन पोहचू द्यायचा नाही.

या सर्व प्रश्नांचा गुंता वाढतोच आहे. स्वातंत्र्याच्या काळात लहानाचे मोठे झालो, वय वाढलं त्याबरोबर प्रश्नही वाढले. इतके की सीमेवर जसा तारांचा गुंता दोन देश वेगळे करतो, तसे आम्ही प्रश्नांच्या गुंत्याआड अडकून पडतो. शिवाय तक्रार करायची नाही. न्याय देवतेच्या डोळ्याबर तर भारतातल्या सामान्य नागरिकाच्या तोंडावर, कानावर घट्ट चिंध्या बांधल्या आहेत, होईल ते ते फक्त पहात रहा व तारखांचे चौकोन फाडून प्रगती मोजणारे आकडे वाचीत रहा हीच त्याची नियती असावी !

तेव्हा आणखी एक नवे वर्ष 'पाईप लाईन' मध्ये आहे. निवडणुकांचा तमाशा घेऊन येणारं, अपघाताच्या निष्क्रीय करणाऱ्या असंख्य घटनांच्या बातम्या घेऊन तेही उमलू पहातं आहे. उगवो बिचारे. वर्ष मावळली काय उगवली काय, सामान्यांच्या प्रश्नांकित क्षितिजात काय फरक पडतोय?

'इतकं टोकाचं निराश होण्यासारखं नाही बरं का, प्रत्येक काळ्या ढगाला सोनेरी कडा असते.' संपादकीय वाचल्यावर असंही वाटेल तुम्हाला ! बरोबरच आहे. आशा आहे म्हणून आपण आहोत निराश होऊन उदास वाटतं तेव्हा आशेचे (न) उगवणारे किरणच मनात उजाडत रहातात.

माझ्यातल्या कवीनं विचारले मला, 'अरे उद्या सकाळसाठी दाणे ठेवतोस ना वाटीत, खिडकीत येणाऱ्या चिमण्यांसाठी...? आणि मी वाटीत दाण्यांची ओंजळ ओतली. उद्याच्या उजळलेल्या 'दिशांची' स्वप्ने पहात.

•••

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत. आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे. आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी/जाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी.

चेक ''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी सह कळवावा.

# श्री गुरुदेव दत्त !

*या महिन्यात ८ तारखेस दत्तजयंती आहे. त्या निमित्ताने हा विशेष लेख. - संपादक*

## एक आगळा अवतार

श्री दत्तात्रेयाच्या अवताराचे रहस्य श्रीधर स्वामींनी 'श्रीराम विजय' ग्रंथांत खालीलप्रमाणे वर्णिले आहे.

अवतारही उदंड होती ।
सवेचि मागुति विलया जाती ।
तैशी नव्हे श्रीदत्तात्रेय मूर्ती ।
नाशकल्पान्ती असेना ।
पूर्ण ब्रह्म मुसावले ।
ते हे दत्तात्रेयरूप ओतिले ।
ज्याचे विलोकन मात्रे तरले ।
जीव अपार त्रिभुवनी ।
(श्रीराम विजय १३/२१.२२)

भारतातील बहुतेक ठिकाणी विशेषतः महाराष्ट्रात श्री दत्त व त्याची उपासना ही मोठ्या प्रमाणात आढळते. किंबहुना खेड्यातून, शहरातून श्री दत्त उपासना, भजन, पूजन आदी कार्यक्रम प्रत्येक गुरुवारी आणि काही ठिकाणी शनिवारी नेहमी होत असताना दिसतात. काही ठिकाणी गुरुचरित्र, दत्त-प्रबोध, दत्त माहात्म्य आदी ग्रंथांची पारायणे दत्तभक्त करताना आढळतात. अनेक दत्तावतारी महात्म्यांची शिष्य-परंपरा सांप्रतही चालू असलेली आढळते.



काही दत्त क्षेत्रांतून विशेषतः नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर, माहूर, कारंजा आदी दत्तक्षेत्रात दत्तभक्तांची गर्दी वाढत्या प्रमाणात सांप्रतही आढळते. एखादी व्यक्ती आकस्मिकपणे येऊन उभी ठाकली असता 'दत्त म्हणून उभा ठाकला' अशी म्हण अनेकांच्या तोंडी ऐकावयास मिळते. अशा या दत्तावताराचे अनेक जे विशेष आहेत, त्यात दत्तावतार इतर अवतारांप्रमाणे दुष्टांचा नाश करून समाप्त होणारा नाही. आपल्या उपदेशाने जगाचा उद्धार करीत चिरंजीव असलेला हा अवतार आहे. दत्त हे दैवत ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन प्रमुख देवांचे व त्यांच्या कार्यांचे ऐक्य रूप आहे. सृष्टीची उभारणी, जोपासना, व संहार या कार्यांशी संबंधित असलेल्या या तीन देवांचे एकरूपत्व म्हणजे दत्तात्रेयाचा अवतार होय.

दत्त मूर्ती त्रिमुखी अथवा एकमुखी दत्तात्रेयांच्या मूर्तीप्रमाणेच दत्तपादुकांची पूजाअर्चा अनेक ठिकाणी होते. गुरुवार हा दत्ताचा वार म्हणून मानला जातो. या दिवशी दत्तात्रेयाच्या भजन-पूजनाचे प्रकार दत्तमंदिरात अगर दत्तभक्तांच्या घरी होतात. मार्गशीर्ष पौर्णिमेस दत्तजयंती मोठ्या प्रमाणात उत्साहाने साजरी केली जाते. दत्तप्रभूंच्या उपासनेत योगमार्गाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. शाक्त व तांत्रिक मंडळींनीदेखील दत्तात्रेयांना आपले दैवत मानले आहे. त्रिमुखी मूर्तीची कल्पना वेदपूर्व काळापासून असून ब्रह्मा, विष्णू, महेश

यांच्या रूपाने ती कालांतराने साकार झाली. आज आपणास सर्वत्र प्रामुख्याने त्रिमुखी दत्त आढळतो. परंतु महाभारत, पुराणे, उपनिषदे यांत एक मुखीच दत्त असल्याचे ध्यानात येते. महानुभाव पंथात एकमुखी दत्ताची उपासना चालते. दासोपंत दत्त उपासक एकमुखी पण सहा हात असलेल्या दत्तमूर्तींची उपासना करतात. मात्र गुरुचरित्र काळापासून समन्वयाचा प्रभाव वाढत गेला व त्रिमूर्तीची कल्पना लोकमानसावर ठसली.

एकनाथ महाराज दत्ताच्या आरतीत - 'त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा ।' असाच उल्लेख करतात. श्री तुकाराम महाराज आपल्या अभंगात - तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत । तुका म्हणे दिगंबरा । तुम्हा माझा नमस्कार असेच म्हणतात.

**श्री दत्ताचा वेष**

काषाय वस्त्रं करि दण्ड धारिणं कमण्डलुं शंख धरेण हस्तं
चक्रं गदा भूषण भूषिताढ्यं श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये ।

श्री दत्ताचा वेष प्रामुख्याने यतीप्रमाणे वैराग्यसूचक आहे. माथ्यावर जटाभार, गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगास भस्म हातात दंड कमंडलु, त्रिशूल डमरू, शंख, चक्र इत्यादी आयुधे, अंगावर मृगचर्म, या वेषात श्री दत्त वावरतात. कधी मलंगाच्या, कधी फखिराच्या पिशाच्या, व्याघ्र-सर्पादी प्राण्यांच्या वेषात फिरताना आढळतात. अशा वेषात श्री दत्त भेटल्याच्या साक्षी अनेक दत्तभक्तांनी दिल्या आहेत.

**श्री दत्ताची अनेक रूपे**

अवधूत हा संन्यस्त वृत्तीचा सत्पुरुष होय. अवधूत म्हणजे वेदपुरुष. अवधूत शब्दाची उकल अशीही केली जाते. अ- अक्षरत्व, व - वरेण्य (श्रेष्ठत्व), धू-धुतलेला, बंधरहित त-तत्त्वमसि । हे महावाक्य, थोडक्यात अवधूत म्हणजे ब्रह्म होय.

दत्तात्रेयाला नरहरी हेही नाव लावले जाते. नरहरी म्हणजे नृसिंह. हिरण्यकश्यपूचे पोट फाडल्यामुळे नृसिंहाच्या बोटांचा दाह झाला. तो कमी करण्यासाठी त्यांनी औदुंबर वृक्षाचा व फळांचा आश्रय घेतला. औदुंबराच्या फळात भगवंतांनी बोट खुपसून शीतलता प्राप्त केली. म्हणून दत्ताचा निवास औदुंबर तळी असल्याचे प्रसिद्ध आहे. दत्ताचा द्वितीय अवतार नृसिंह सरस्वती-नरहरी रूपानेच ओळखला जातो. याप्रमाणे दत्त व नरहरी एकरूप मानण्यात येते. अशा प्रकारे समन्वय साधला जातो.

**श्री दत्तसंचार**

आर्तांना पीडितांना दुःखितांना संरक्षण देत देत श्री दत्त सर्वत्र संचार करीत असतात. श्री गुरूच्या स्वरूपात उपदेश देतात. या संचारी दत्तात्रेयाचा दिनक्रम सर्व भारतभर भ्रमण करण्याचा आहे.

गंगा स्नान तुंगा पान । कृष्णातीरी अनुष्ठान ।
दक्षिण काशी भिक्षास्थान ।
योग निद्रा माहुरी जाण ।

असे दत्तभक्त बाळेकुंद्री यांनी म्हटले आहे.

**दत्तमूर्तीबरोबरील काही प्रतिके**

धेनू (गाय) पृथ्वीचे प्रतीक, चार श्वान - चार वेद, रुद्राक्षमाळा यातील संख्या बावन्न, म्हणजे बावन्न अक्षरे, त्यांना बीजमंत्राचे सामर्थ्य आहे. हातातील त्रिशूळ - आचार, व्यवहार व प्रायश्चित अथवा धर्म-अर्थ-काम यांचे प्रतीक.

**श्री दत्ताचे माता-पिता**

श्री दत्ताचे माता-पिता अत्री व अनसूया यांचेही उल्लेख फार प्राचीन काळापासून मिळतात. यांचा उल्लेख ऋग्वेदातूनही आढळतो. यांच्या पोटी दत्त, दुर्वास व सोम असे तीन पुत्र झाले. रामाने अत्री आश्रमाला भेट दिल्याचा

उल्लेख अयोध्याकांडात आहे. (अयोध्याकांड अ. ११७ ते ११९) . अत्री ऋषींचा उल्लेख ऋग्वेदात अग्निवाचक भृगु, आंगिरस यांच्यासमवेत अग्नीचा संबोधक म्हणून अत्रीचे नाव येते. अनसूया-पृथ्वी क्षमाशील, निर्मत्सरी या उभयतांचे फळ दत्तात्रेय.

दहा मानसपुत्रांपैकी अत्री हा एक मानसपुत्र. कर्दम प्रजापतींची कन्या अनसूया ही अत्री भार्या. अत्रींला सूर्य ग्रहणासंबंधी ज्ञान झाल्यामुळे ग्रस्त सूर्याला अत्री सोडवतो. अशी समजूत रूढ झाली. याच्या कुळातले पुरुष कवी होते. तसेच लढवय्ये होते. यांनी रचलेले पर्जन्यसूक्त (ऋग्वेद मं. ५ सूक्त ४२) ओजस्वी आहे. अत्री सप्तर्षींपैकी एक श्रेष्ठ कर्मनिष्ठ व तेजस्वी म्हणून गणला गेला. अत्री संहिता व अत्री स्मृती असे दोन ग्रंथ याच्या नावावर आहेत. योग, तप, कर्मविपाक, द्रव्यशुद्धी, प्रायश्चित्त-विचार असे अनेक विषय चर्चिले आहेत.

### सती अनसूया -

कर्दमाला देवहूतीपासून झालेली ही कन्या अत्री ऋषींची भार्या - एक थोर पतिव्रता म्हणून प्रसिद्ध आहे. मांडण्य ऋषी सुळावर असताना एका स्त्रीचा चुकून त्याला पाय लागला. मांडण्याने तू उद्या सूर्योदयाच्या आत विधवा होशील असा शाप दिला. ती स्त्री अनुसूयेची मैत्रीण होती. तिने सूर्य उगवू द्यावयाचा नाही, असे ठरविले. यामुळे मोठा हाहाकार उडाला. अनसूयेने आपल्या तपोबळावर सखीचा शाप नाहीसा करून सूर्याला उगवू दिले. तिच्या सती-सामर्थ्याबद्दल उमा, लक्ष्मी, सावित्री यांना मत्सर वाटू लागला. तिचे सत्त्वहरण करण्यासाठी आपआपल्या पतिराजांना तिच्याकडे पाठविले.परंतु तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावामुळे या तिघांनाही अनुसूयेने बालके बनविले व तिच्या घरी त्यांना बालके म्हणून राहावे लागले. या तीन देवतांच्या प्रसन्नतेने त्यांचे अंशभूत तीन पुत्र तिला प्राप्त झाले. ब्रह्मांश सोम, विष्णू अंश दत्त, महेश अंश दुर्वास. पुढील काळात तिला अशी तीन मुले झाली.

निरनिराळ्या पुराणांतून दत्तजन्माच्या कथा निरनिराळ्या असल्या तरी श्री दत्त हा अत्री-अनसूयेचा मुलगा व विष्णूचा अवतार यात एकवाक्यता आढळते. वायू, ब्रह्मांड, कूर्म, विष्णू , मार्कंडेय, पद्म आदी पुराण ग्रंथांतून दत्तात्रेयांच्या जन्मकथा व चरित्रकथा आल्या आहेत. श्री गुरुचरित्रातून थोड्या फार फरकाने वरीलप्रमाणेच कथा आलेली आहे. सती अनसूयेचा प्रभावच त्या कथेतही आढळतो. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी) यांनी दत्तमाहात्म्यात श्री दत्तात्रेयांचे बोधचरित्र सविस्तर वर्णिले आहे. त्यात जन्मदिनाबद्दल असे म्हटले आहे - मार्गशीर्ष पौर्णिमेसी । बुधवारी प्रदोष समयासी । मृगनक्षत्री शुभदिवशी । अनसूयेसी पुत्र झाले । श्री वासुदेवानंद सरस्वतींनी दत्तात्रेयाचे षोडष अवतार या ग्रंथांत विस्ताराने प्रत्येक अवताराच्या जन्मतिथीसह निर्देश केलेला आहे.

### दोन प्रसिद्ध दत्तावतार

कलियुगातील दोन प्रसिद्ध दत्तावतार म्हणजे श्रीपाद श्री वल्लभ व नृसिंह सरस्वती हे होत. श्रीपाद वल्लभांचे अवतारकार्य चौदाव्या शतकातील पूर्वार्धात व त्यांचाच पुढचा अवतार श्री नृसिंह सरस्वतींचा मानतात. त्यांचा काळ चौदाव्या शतकाची अखेर व पंधराव्या शतकाचा पूर्वार्ध असा येतो. या काळी परकीय राजवट महाराष्ट्रात स्थिरावलेली होती. सन १२७१ मधे देवगिरीच्या गादीवर रामदेव यादव आला. त्या वेळी दिल्लीचे तख्त अल्लाउद्दीन खिलजी याजकडे होते. त्याने १२९४ मधे देवगिरीवर स्वारी केली. देवगिरीचे राज्य मुसलमानाकडे गेले. चौदाव्या शतकाच्या प्रारंभापासून देवगिरीचे राज्य परकीय सत्तेखाली जखडले गेले. हे आक्रमण केवळ राजकीय नव्हते. धार्मिक छळही झाला.

पहिला अवतार १३२० ते १३५० च्या काळातला व दुसरा १३७८ ते १४५८. या दोन्ही अवतारांनी बहामनी

राज्य पाहिले. निरपराध हिंदूंची कत्तल, स्त्रियांवर अत्याचार, मंदिरांचा विध्वंस ही कृत्ये भयानक होती. क्षत्रिय राजे दुर्बळ, ब्राह्मण तेजोहीन व परकीय सत्ता जुलमी अशा पार्श्वभूमीवर श्रीपाद वल्लभ व नृसिंह सरस्वती यांचे कार्य पहावे लागेल.

वैदिक धर्माचा पुनरुद्धार करण्याची फार मोठी कामगिरी या दोन दत्तावतारांनी केली आहे. यांनी सर्व स्त्री पुरुषांना आचारधर्माचा श्रेष्ठ व सोज्वळ मार्ग दाखवून पडत्या काळात समाजाला सावरून धरले. दत्त पंथात हिंदू धर्मियांबरोबर इस्लामी धर्माचेही अनुयायी दिसतात. अक्कलकोटचे स्वामी समर्थ, हुमणाबादचे श्री माणिकप्रभू, शिरडीचे साईबाबा यांच्या अनुयायांतील मुसलमान अनुयायांची संख्या लक्षणीय आहे.

या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर श्रीपाद वल्लभांचा अवतार झाला. श्री गुरुचरित्रात पाच व नऊ या अध्यायांत या दत्ताच्या पहिल्या अवताराची माहिती आलेली आहे. आंध्र प्रदेशातील पिठापूर गावी आपलराज हा आपस्तंब शाखेचा ब्राह्मण राहात होता. त्याची भार्या सुमता नावाची होती. तिला वरप्राप्तीमुळे पुत्र झाला. त्याचे नाव श्रीपाद ठेवले. मोठा झाल्यावर त्याच्या विवाहाबद्दल चर्चा सुरू झाली. माझे वैराग्य स्त्रीशी लग्न लागले आहे, असे म्हणून आईचे सांत्वन करून तो घराबाहेर पडला. त्याचे पूर्वीचे भाऊ आंधळे व पांगळे होते. त्यांना धडधाकट केले आणि मातेचा निरोप घेतला. काशी, श्रीशैल्य आदी यात्रा करून कुरवपूर इथे स्थायिक झाले. सन १३५० साली श्रीपाद वल्लभ समाधिस्थ झाले. भक्तजनांना तारण्यासाठी-दुष्टांचा निग्रह करण्यासाठी श्रीपाद वल्लभांचा अवतार होता. कुरवपूरचा महिमा गुरुचरित्रातल्या दहाव्या अध्यायात वर्णिला आहे. श्रीपाद कुरवपुरीच नांदतात, असा विश्वास दिला आहे.

**कारंजनगरी नृसिंहजन्म**

गुरुचरित्र अध्याय - आठ येथील कथेप्रमाणे श्रीपाद यतींच्या सांगण्याने अंबा नावाची स्त्री शनिप्रदोष व्रत करीत राहिली. तिचा माधव नावाच्या ब्राह्मणाशी विवाह झाला. तिला पुत्र झाला. हा मुलगा अवतारी पुरुष होईल, असे भविष्य वर्तविण्यात आले. हा त्रिभुवनात पूज्य होऊन याच्या दर्शनाने पतीत पुनीत् होऊन जातील. मुलाचे नाव शाळिग्रामदेव ठेवले व नरहरी या नावाने हाक मारीत असत. - वयाच्या सात वर्षापर्यंत ॐ या शब्दाशिवाय दुसरा शब्द हा मुलगा उच्चारीत नसे. याचे व्रतबंधन झाले. वाचा आली. मातेला उपदेश केला. तिला आणखी चार पुत्र होतील, असे सांगितले. आईला जुळे झाले. हा बालक घराबाहेर पडला. त्याला निरोप देण्यासाठी सर्व कारंज शहर लोटले.

नरहरीने श्री नृसिंह सरस्वती असे नाव धारण केले. शिष्यासह बदरीवनाकडे गेले. मग ते गंगासागरी आले, तेथून प्रयाग येथे माधव नावाच्या ब्राह्मणाला दीक्षा दिली. त्याचे माधव सरस्वती असे नाव ठेवले. अनेक शिष्य त्यांना मिळाले. तेथून जन्मग्रामी कारंजा येथे आले. घरातील भावंडांची भेट घेऊन पुनः घराबाहेर पडले. यात्रा करीत कृष्णा-पंचगंगा संगमावरील अमरपूरास आले. अमरपूर म्हणजे आजचे औरवाड. येथे औदुंबर वृक्ष आहे. नदीपलीकडे जाऊन ते ध्यानस्थ बसत. तीच नृसिंहवाडी वा नरसोबाची वाडी म्हणून प्रसिद्ध आहे.

श्री गुरुंना संगमाचे फार आकर्षण. भीमा-अमरजा संगमाची ओढ लागली. तेथे त्यांनी जवळजवळ तेवीस वर्षे वास्तव्य केले. गाणगापुरात ते राहिले. महाराष्ट्रात दत्त संप्रदायाचा प्रसार नृसिंह सरस्वतींमुळे झाला. ते सन १४५८ साली निजानंदी लीन झाले. थोडक्यात सन १३७८ ते १४५८ पर्यंतचा नृसिंह सरस्वतींचा काळ मानला जातो. धर्म स्थापना व लोकरक्षण हे कार्य नृसिंह सरस्वतींनी केले.

दत्तजन्माच्या विविध कथा, दत्त दैवताचे रूप यांचा परिचय करून घेतानाच या दैवताचे स्वरूप संमिश्र असल्याचे ध्यानात येते. हे दैवत समन्वयाचे आहे. विविधेत

ऐक्य पाहावयाचे आहे. दत्त आत्मिक व भौतिक सुखाची प्राप्ती करून देतो. दत्तपरंपरेत बहुतेक उपासना पंथ सामावलेले दिसतात. शैव, वैष्णव, महानुभाव, गोसावी, अवधूत, सूफी, वारकरी, रामदासी, देवीभक्त इत्यादी अनेक उपासना पंथांना दत्तात्रेय आपले वाटतात. या पंथात सर्व थरातील समाज आहे. नाथ पंथाची जोपासना दत्ताच्या बोधावर व उपासनेवर झालेली आहे. दत्त उपासनेत अनेक परंपरा आहेत. आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आदी प्रांतांत श्री दत्ताची प्रसिद्ध स्थाने आहेत. पिठापूर, कुरवपूर ही आंध्रात आहेत. इथे श्रीपाद वल्लभ श्री नृसिंह सरस्वतींना कन्नड व तेलगु प्रांतांतील अनुयायी लाभले. आजचे माहूर पूर्वी हैदराबाद संस्थानात होते. बिदर, गाणगापूर, श्रीशैल्य, गोकर्ण, महाबळेश्वर, विजापूर इथे दत्त संप्रदाय आहे. गुजरात, नारेश्वर, गरुडेश्वर ही स्थाने श्री रंगावधूत व श्री वासुदेवानंद सरस्वतींमुळे प्रसिद्ध आहेत. राजस्थानात गिरनार हे प्रसिद्ध दत्तस्थान मानले जाते. तसेच हुमणाबाद हे श्री माणिकप्रभूंमुळे प्रसिद्धीला आले.

## श्री गुरुपादुका

श्री दत्त उपासनेत अनेक ठिकाणी पादुका पूजनास महत्त्व आहे. दत्तात्रेय सर्वत्र गुरूस्वरूपात आढळत असल्याने त्यांच्या चरणपूजेचा महिमा वाढलेला आहे. सर्वपापविशुध्दात्मा श्रीगुरोः पादसेवनात । पूजामूलं गुरोःपदम् । पूजेचे मूळ स्थान गुरुचरण आहेत. श्रेष्ठ सत्पुरुषाची सारी दैवी शक्ती त्यांच्या चरणात एकवटलेली असते. त्यांच्या चरणस्पर्शाने कंपनांद्वारा ती शक्ती भक्तात संचारत असल्याचा अनुभव अनेकांना आला आहे. गिरनारच्या शिखरावर श्री दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत. विष्णू देवतेचा जसा शाळिग्राम तशी दत्त उपासनेत दत्ताच्या पादुका महत्त्वाच्या आहेत. आणि म्हणूनच 'मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी, तेथे सद्गुरु तुझे पाय दोन्ही' असे म्हटले जाते.

## संगीत सेवा

दत्त पंथियांच्या उपासनेत असणाऱ्या संगीत कलेचे महत्त्वाचे स्थान आहे. नाद हा प्रत्यक्ष ब्रह्म व त्याची उपासना म्हणजे परमेश्वर पूजा मानली आहे. नृसिंह सरस्वती म्हणतात - आणिक सांगेन एक खूण । गायनी करावे मा॰ स्मरण । त्याचे घरी मी असे जाण । गायनी प्रीति बहुमन । (श्री गुरुचरित्र अध्याय ५१-४०) दत्तप्रेमींयांना संगीताची आराधना प्रिय आहे. संगीताच्या माध्यमातून त्याना नादब्रह्माच्या द्वारे साक्षात्कार होतो. ब्रह्मा-विष्णू-महेश यांची उपासना आपोआप होते. कारण ते देव नादब्रह्म आहेत. न=प्राण, द=अग्नी यांच्या संयोगाने नाद उत्पन्न होतो. गीत वाद्य, नृत्य यांनी या नादब्रह्माची उपासना होत असते.

## दत्तसांप्रदायिक ग्रंथ

दत्तसंप्रदायात श्री गुरुचरित्राचे स्थान अनन्यसाधारण आहे. नाथ व महानुभव पंथाच्या लोकांनी दत्तविषयक ग्रंथात मोलाची भर घातलेली आहे. दत्त-गोरक्ष संवाद, सह्याद्री वर्णन, सह्याद्री माहात्म्य, श्री दत्तविजय, दत्तात्रेय बालक्रीडा, या ग्रंथांना त्या त्या पंथात मान्यता मिळाली आहे. शके १४८० साली सरस्वती गंगाधरांनी गुरुचरित्र ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. सांप्रदायिकांनी त्याला वेदाठिकाणी मानले. भागवत पंथात ज्ञानेश्वरी, नाथ भागवत व तुकोबांच्या गाथा प्रिय, रामदासी पंथात दासबोध प्रिय तसा दतभक्तांना गुरुचरित्र हा ग्रंथ प्रिय आहे.

श्री गुरुचरित्रात दत्तावतार श्रीपाद श्री वल्लभ व श्री नृसिंह सरस्वती यांचा रसाळ चरित्रकथा सुबोध, प्रसादपूर्ण भाषेत वर्णिल्या आहेत. आचारधर्म विस्तारपूर्वक सांगितलेला आहे. तत्त्वज्ञान बोधही श्रेष्ठ प्रकारचा आहे. अंत:करण असता पवित्र । सदाकाळ वाचावे गुरुचरित्र . हा ग्रंथ श्री नृसिंह सरस्वती निजानंदी बैसले, या घटनेच्या

(पान क्र. १७ वर चालू)

# अभ्यासक्रमावरील शिक्षक प्रशिक्षणाची अनिवार्यता, वारंवारिता आणि मर्यादा

*आजन्म विद्यार्थी राहून नवनवे ज्ञान आत्मसात करण्याची शिक्षकांना सर्वाधिक गरज आहे. त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. या संबंधातील हे विचार - संपादक*

गुरुने दिला ज्ञानरूपी वसा,
आम्ही चालवू हा पुढे वारसा ॥

असे म्हणत ज्ञानमंदिरात प्रवेश घेऊन उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या प्रत्येक विषयाच्या साचेबद्ध अभ्यासक्रमासाठी तो विषय शिकवणारे प्रशिक्षित शिक्षक व विद्यार्थी हे या औपचारिक शिक्षणप्रक्रियेचे महत्त्वाचे असे दोन अपरिहार्य घटक असतात. शिक्षकाने विद्यार्थ्याला शिकवणे, ज्ञान व माहिती मिळविण्यासाठी मदत करणे, यात शिक्षकाला विद्यार्थ्यापेक्षा अधिक ज्ञान असणे अपेक्षित असते. परंतु गेल्या शे-दीडशे वर्षांतील भौतिक या विज्ञान शाखांमधील प्रगती ज्या प्रचंड वेगाने होत आहे - तो वेग सांभाळून स्वतःला अद्ययावत ठेवणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे. संगणक व इंटरनेटसारख्या माध्यमांचा विचार केल्यास, हे म्हणणे अधिक स्पष्ट होऊ शकेल. त्यातून शिक्षकांची पिढी जसजशी जुनी होत जाते तसतशी तिच्यासमोर नवीन ज्ञान-क्षेत्राबरोबर उगवणारी पिढी विद्यार्थ्यांच्या रूपाने येत असते. या दोन पिढ्यांतील अंतर कमी करून शिक्षकाला अधिक सक्षम करणे, ही काळाची गरज ठरत जाते. हे अंतर कमी झाले तरच शिक्षकाचे अध्यापन प्रभावी ठरु शकेल.

या पार्श्वभूमीवर आजच्या विद्यार्थ्यांचा, विशेषतः माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा विचार केल्यास असे दिसते की, पूर्वीच्या काळापेक्षा नवीन तंत्रज्ञानाबरोबर जन्म झालेला असल्याने त्याची ग्रहणशक्ती विलक्षण वाढली आहे. प्रत्येक विषयावर तो आपणहून ज्ञान मिळवू शकेल याच्या शक्यता वाढल्या आहेत. साधनांची उपलब्धीदेखील अधिक प्रमाणात आहे. संगणक घराघरांत पोहोचू पहात आहे. दूरदर्शनमुळे जग घराच्या उंबरठ्यावर आले आहे. आपले माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांच्या प्रमुख प्रेरणेने देशभर राबविण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार (N.E.P.- 1986) आजची शिक्षण प्रक्रिया ही अधिक विद्यार्थीकेंद्रित आहे. त्यामुळे सदोदित नवनवीन ज्ञानक्षेत्रांच्या संपर्कात असणाऱ्या विद्यार्थ्याला अध्यापन करणे, ही मोठी आव्हानाची बाब ठरत आहे.

महात्मा गांधींनी एके ठिकाणी म्हटले होते की, माणूस हा आजन्म विद्यार्थी असतो. यातील मथितार्थ महत्त्वाचा आहे. वरील आव्हान पेलायचे असेल तर माध्यमिक नव्हे, तर एकूणच (कोणत्याही स्तरावरील) शिक्षकाने अद्ययावत राहणे, स्वतःचे ज्ञान, माहिती सतत वाढवत राहणे, हा प्रभावी उपाय आहे. परंतु माणूस हा मूलतः स्थितीप्रिय असल्याने व शिक्षकाचे वयही स्थितीशील होत असल्याने नवे आत्मसात करण्याकडे, आपणहून जाणून घेण्याकडे त्याचा सर्वसाधारण कल नसतो. अर्थात याला अपवादही असू शकतात.

शिक्षकाच्या विद्यार्थीदशेतील बहुतेक विषयांतील संकल्पना कालबाह्य ठरत आहेत. विषयातील बदल स्वीकारणे, ही त्याची जबाबदारी ठरत आहे. याकरिताच शिक्षक प्रशिक्षण दिवसेंदिवस निकडीचे ठरत आहे. तेही त्याच्या २५-३० वर्षांच्या सेवेत एकदाच देऊन भागणार नाही तर, दर पाच-सात वर्षांनी आपल्या ज्ञानग्रहण क्षमतेत वाढ करणे, ही त्यांची गरज आहे. शिवाय स्पर्धा इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, शिक्षकी व्यवसायात स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रशिक्षणाची पूर्तता करावीच लागणार आहे.

परंतु अशा प्रकारच्या शिक्षक प्रशिक्षणासाठी कार्यक्रम आयोजित करणे, त्यात शिक्षकांच्या

(पान क्र. १० वर)

पुस्तक परिचय - 9

# मनाच्या श्लोकांवरील संग्राह्य संदर्भग्रंथ

मराठी संतपरंपरेत सर्वांत श्रेष्ठ संत कोण? याचे उत्तर प्रत्येकाच्या मते वेगळे असू शकते. पण सर्वांत वेगळे संत कोण? याचे उत्तर समर्थ रामदास स्वामी असेच द्यावे लागेल. पारमार्थिक विचारांइतकाच किंबहुना अधिक जोरकसपणे ऐहिक जीवन विचारांचा पुरस्कार करणारे श्री समर्थ रामदास स्वामी हे एकमेव अपवाद असणारे संत होते. रामदासांनी व्यवहाराच्या भक्कम विचारांवर परमार्थाचा विचार मांडला. रामदासांच्या साहित्यावर अनेक चांगले चांगले ग्रंथ लिहिले गेले. किंबहुना 'रामदास स्वामी व त्यांच्या साहित्यावर, तत्त्वज्ञानावर झालेली ग्रंथनिर्मिती : तिचे स्वरूप व वापर' या विषयावर संशोधन करता येईल इतका मोठा असा हा विषय आहे. सरळ आणि सोप्या भाषेत त्यांनी लिहिलेले भुजंगप्रयात वृत्तातील मनाचे श्लोक अनेक अभ्यासकांना, संशोधकांना, तत्त्वचिंतकांना आकर्षित करीत राहिलेले आहेत. आजच्या RET (Rational Emotion Therapy) चा अवलंब करणाऱ्या मनोविकार तज्ज्ञांनाही मनाच्या श्लोकांतील विचारांचे आकर्षण वाटत असते. याचे सरळ कारण या उपचार पद्धतीचा इतका चांगला व सोपा आशय इतर साहित्यातून मिळणे कठीण आहे.

या पार्श्वभूमीवर जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल, व्यासंगी वाचक श्री. हरिभाऊ श्री. परांजपे यांनी लिहिलेले पुस्तक वाचले. श्री. परांजपे यांच्या या पुस्तकाचे प्रमुख दोन विशेष आहेत. ते म्हणजे, मूळ श्लोक दिल्यानंतर ते पद्यातच त्याचा अर्थ (काव्यानुवाद) देतात. त्यामुळे मूळ चरण वाचल्यानंतर ज्या वाचकाला त्याचा अर्थ समजण्यात अडचण येते, त्याला तो चरण पटकन समजतो. जेथे चरण बदलण्याची गरज नाही तेथे उगाचच चरण बदलला नाही, तर तसाच ठेवला आहे. याची ३-४ उदाहरणे पाहणे सयुक्तिक ठरेल.

१) 'मना यातना थोर हे गर्भवासी' हा चरण 'मना गर्भवासी यातना थोर रे' असा बदलला आहे. या अन्वयामुळे, त्यातील स्वल्पविरामामुळे अर्थात सुगमता येते. (पृ. २१)

२) 'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी' या चरणाचा 'दासाभिमानी राम कदा नुपेक्षी' हा अन्वय (पृ. ३७)

३) 'भजाराम विश्राम योगेश्वरांचा' याचा 'योगेश्वरांचा विश्राम राम भजा' असा अन्वय.

यामुळे एखादा चरण मनात स्पष्ट झाला नाही तर लगेच उजव्या बाजूचा अन्वय पाहून त्याचा अर्थ सहज समजतो.

शब्दार्थ व गद्य मराठीत सुगम अर्थ हे या मांडणीतील पुढील भाग आहेत. अशा प्रकारची मांडणी असणारी मनाच्या श्लोकांची काही पुस्तके आहेत. पण परांजपे सरांनी जे शब्दार्थ दिले आहेत ते अतिशय तपशिलात व स्पष्ट शब्दात दिले आहेत. याचे महत्त्वाचे कारण ग्रंथपाल असल्याने कोशांचा योग्य आधार घेण्याचे भान त्यांच्यात जागे आहे. त्याचबरोबर या व्यवसायाचा एक आपोआप आवश्यक असणारा विकसित होणारा भाग म्हणजे पृथःकरण व संश्लेषण करण्याची जाण. त्यामुळे इतर पुस्तकात जसे केवळ शब्दार्थ दिलेले असतात तसे यात नाही, तर त्याहून अधिक काही आहे.

या ग्रंथाचा मला भावलेला आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे अचूक शब्दात व्यक्त झालेले चिंतन. या चिंतनातही आवश्यक असेल तेथे याच दोनशे पाच श्लोकांतील संदर्भही दिले आहेत. चिंतनाबाबत महत्त्वाचे म्हणजे अगदी स्पष्ट भाषेत व मोजक्या शब्दात ते केले आहे.

चिंतन अधिक स्पष्ट व उपयुक्त ठरावे म्हणून योग्य त्या ठिकाणी गीता, गीताई, ज्ञानेश्वरी अशा साहित्यातील समान अर्थांचे संदर्भ दिले आहेत. रामाचे वर्णन वेगवेगळ्या श्लोकात कसे वेगळे आले आहे, याचा संदर्भही चिंतनात मिळतो. संदर्भ, उलट संदर्भ या सर्वांमुळे मनाचे श्लोक वाचल्यावर त्यातील प्रतिपाद्य विषयाची जाण अधिक समृद्ध होते.

पृ. २०७ ते २२८ यात आलेली परिशिष्टेही अभ्यासास उपयोगी आहेत.

मराठी हा विषय घेऊन बी. ए., एम.ए. च्या स्तरावर अभ्यास करणाऱ्यांना विद्यापीठाने हे पुस्तक अभ्यासासाठी लावावे असे आवर्जून सांगावेसे वाटते. संतसाहित्याची व त्यातही रामदासांच्या साहित्याची उपेक्षा करण्यापेक्षा आजच्या जीवनात मार्गदर्शक ठरतील असे कितीतरी विषय या साहित्यात आले आहेत. श्री. परांजपे सरांनी हे पुस्तक प्रसिद्ध करून असा अभ्यास करणाऱ्यांसाठी अनमोल संदर्भग्रंथ केला आहे.

श्री मनाचे श्लोक : मनोवेधक मनन-चिंतन

ह. श्री. परांजपे

प्रकाशक : श्री. ह. श्री. परांजपे, मुंबई, २००३

मूल्य रु. १४०/- पृ. २२८

**मोहन पाठक**
ग्रंथपाल, वांदोडकर महाविद्यालय,
ठाणे

(पान क्र. ८ वरून)

**अभ्यासक्रमावरील शिक्षक प्रशिक्षणाची अनिवार्यता, वारंवारिता आणि मर्यादा**

ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त ठरतील असे तज्ज्ञ बोलावणे, सलग दोन-तीन आठवडे हा कार्यक्रम राबविणे, हे अतिशय अवघड आहे. यासाठी लागणारे सक्षम मनुष्यबळ, वेळ आणि पैसा यांची सांगड घालावी लागते. प्रशिक्षणाकरिता निवडल्या गेलेल्या शिक्षकांना दैनंदिन कार्यातून मोकळे करणे, या काळातील वेतन व कार्यक्रम भत्ता यांची आर्थिक जबाबदारी उचलणे, शिबिरासाठी त्यांच्या निवासाची सोय करणे, त्यांच्या दैनंदिन वेळापत्रकाची जबाबदारी दुसऱ्याला देणे या सगळ्यांसाठी होणारा खर्च आणि त्यातून होणारी निष्पत्ती यांचे मूल्यांकन लक्षात घ्यावे लागेल असे आहे. त्यामुळे एखाद्या विषयावर तालुका, जिल्हा वा विभागीय स्तरावर असे प्रशिक्षणाचे किती कार्यक्रम राबविले जावेत, हा प्रश्न गंभीर ठरतो ! शिक्षकाचे मध्यम वय लक्षात घेता त्यांच्यात हे नवीन आत्मसात करण्यास लागणारी इच्छाशक्ती, उमेद यांचा अभाव असण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम 'मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर' अशा कोरडेपणाने, चटावरचे श्राद्ध उरकावे तशा पद्धतीने उरकले जातात.

परंतु एकूण जागतिक स्तरावरील शिक्षणाची प्रगती पाहता स्पर्धेत आपण कमी पडणार नाही हे शासनाला पहावे लागते. त्यामुळे कितीही अडचणी असल्या तरी जनतेच्या पैशातून असे कार्यक्रम शासन घेतच असते. ती काळाची गरज असते. या कार्यक्रमांची निष्पत्ती ठरवायची कशी ? तर शिक्षकांनी आपली मानसिकता बदलायला हवी. एकूण शिक्षण क्षेत्राकडे अधिक सकारात्मक दृष्टीने त्यांनी पहायला हवे. तरच अनिवार्य असणारी अशी प्रशिक्षणे वारंवार घेण्याचा उपयोग होऊ शकतो व मग अडचणींचा पाढा वाचण्याची गरज राहात नाही.

**शिल्पा महाजन**
ग्रंथालय व माहितीशास्त्र, पदवी अभ्यासक्रम
वांदोडकर महाविद्यालय, ठाणे

पुस्तक परिचय -२

# आला संतांचा मेळा

संतांच्या जीवनाचा अभ्यास का करावा, संतांच्या चरित्रांचे वाचन का करायचे, या प्रश्नांचे उत्तर या संतांच्या जीवनातील ईश्वरनिष्ठे प्रमाणेच त्यांच्या आचार-विचारातून व्यक्त होणारी अनेक चांगली मूल्ये आपल्या जीवनचरित्रासमोर आदर्श ठरू शकतात. सहिष्णुता, जातीपातीपलीकडे जाऊन माणसांशी सर्वधर्मसमभावाने, कळकळीने वागण्याची तऱ्हा - ही व अशी गुणवैशिष्ट्ये संतांच्या अस्तित्वाचा स्थायी भाव असतो. किंबहुना त्यामुळेच त्यांना संतत्व प्राप्त होते, अधिकार प्राप्त होतो.



म्हणूनच संस्कारक्षम वयात आपली मुले अशी चरित्रे वाचतील हे पाहणे पालकांची नैतिक जबाबदारी आहे. ठाण्यातील ज्येष्ठ लेखक, तत्त्वज्ञान व धर्मविषयक साहित्याचे गाढे व्यासंगी श्री. शंकरराव मठ यांचे **'आला संतांचा मेळा'** हे पुस्तक वाचल्यावर वरील विचार प्रकर्षाने मांडावेसे वाटतात.

या छोट्या पुस्तकात एकूण ८ लेख आहेत. त्यांचा क्रम पाहता एकूण भारतीय संतांविषयी महत्त्वपूर्ण माहिती यात आली आहे हे लक्षात येते. हे लेख असे -

१) श्री जयदेव कवी आणि त्यांचे गीतगोविंद - अल्पपरिचय
२) गीतगोविंद काव्य - आस्वाद
३) वैष्णव संप्रदाय आणि श्री चैतन्य महाप्रभू
४) श्री संत तुलसीदास आणि त्यांचे कार्य
५) संतश्रेष्ठ कबीर आणि त्यांची शिकवण
६) संत मीरा
७) कर्नाटकातील सांस्कृतिक चळवळ दासकूट आणि भक्त पुरंदरदास
८) आला संतांचा मेळा

शेवटच्या लेखात संतांच्या कार्याचे महत्त्व व महाराष्ट्राची संतपरंपरा यांचा विचार लेखक मांडतात. महाराष्ट्रातील संतांची काही प्रमाणात विद्यार्थ्यांना माहिती असते, पण महाराष्ट्राबाहेर भारतात होऊन गेलेल्या तितक्याच महान कर्तृत्वाने काळावर ठसा उमटविणाऱ्या संतांचा तितकासा परिचय नसतो. वास्तविक यातील एक एक संत व त्याचे कार्य, साहित्य हा स्वतंत्र अभ्यासाचा चिंतनाचा विषय आहे. पण आजच्या गतिमान जीवनात विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची तोंडओळख झाली तरी ते महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्या दृष्टीने सदर पुस्तक सर्व विद्यार्थ्यांनी वाचणे गरजेचे आहे.

श्री. शंकरराव मठ यांच्या लेखनशैलीचे काही प्रमुख विशेष लक्षात घेण्यासारखे आहेत. आपला प्रतिपाद्य विषय ते अतिशय स्पष्टपणे मांडतात. त्यामुळे मांडणीमध्ये एक सुलभता येते. विषयाचे आकलन पटकन होते. उदा. संत मीराबाई या विषयाची मांडणी करताना संक्षिप्त व्यक्तीचित्रण, नंतर जन्म व बालपण, तिचा स्वभाव, नंतर तिच्या जीवनातील घटिते व नंतर तिच्या काव्यातील विचार. श्री. मठ यांची भाषाही अतिशय सहज व सुलभ आहे. त्यामुळे त्यांचे लेखन वाचताना कोठेही क्लिष्टता नसते. भाषेतील ओघामुळे पुस्तक एका बैठकीत वाचून पूर्ण होऊ शकते.

**आला संतांचा मेळा**
**श्री. शं. बा. मठ**
ठाणे, अरविंद प्रकाशन, २००३
पृ. १३६ मूल्य : रु. १३०/-

**- प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल, बांदोडकर महाविद्यालय,
ठाणे - ४००६०१.

•••

# २७ व्या राज्यस्तरीय अर्थपरिषदेची संग्राह्य स्मरणिका

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे २७ वे अधिवेशन नोव्हेंबरअखेरीस ठाणे जिल्ह्यातील पालघर येथील वैकुंठवासी सोनोपंत दांडेकर कला, वा. श्री. आपटे वाणिज्य आणि एम्. एच्. मेहता विज्ञान महाविद्यालयाने आयोजित केले होते. या परिषदेनिमित्ताने प्रसिद्ध करण्यात आलेली स्मरणिका एक उत्तम स्मरणिका कशी असावी, त्याचे उदाहरण झाली आहे. स्मरणिका समितीचे अध्यक्ष (प्रा. अ. बा. देशपांडे) व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नास दाद द्यावी इतक्या चांगल्या दर्जाची स्मरणिका आहे.

स्मरणिकेच्या सुरुवातीस छायाचित्रे, संस्था व शहर परिचय इ. प्राथमिक व आवश्यक मजकूर अतिशय नेटकेपणाने देण्यात आलेला आहे. त्यानंतर मुख्य मजकुरास सुरुवात झालेली आहे. यातही सुरुवातीस गेल्या २६ अधिवेशनांतील सर्व आवश्यक माहिती दिली आहे.

यानंतर परिषदेत सादर करण्यात आलेले शोध निबंध, शोधनिबंधांचा गोषवारा विषयानुसार ४ विभागांत देण्यात आलेला आहे. ४ विभागांत दिल्याने लेख शोधताना थोडी गैरसोय होते. त्यासाठी एकत्रित पृष्ठनिर्देश करणारी अनुक्रमणिका उपयुक्त ठरली असती. तसेच तीन दिवसांचा कार्यक्रम कसा होता, त्यातील सत्रे कशी होती, याची कल्पना येण्याच्या दृष्टीने कार्यक्रम पत्रिकेचा समावेश करण्यात आला असता तर अधिक चांगले झाले असते.

सर्व निबंध वाचताना जाणवलेला महत्त्वाचा भाग म्हणजे यातील लेख अभ्यासपूर्ण असल्याने अर्थशास्त्रात रस असणाऱ्यांना स्मरणिका हे उत्तम संदर्भ साधन ठरू शकेल असे झाले आहे. मुंबई विद्यापीठाच्या सर्व वाणिज्य महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या ग्रंथालयांत ही स्मरणिका संदर्भासाठी, अभ्यासासाठी अशी आहे. उदा. निर्गुंतवणुकीचे धोरण (२२) या विषयावरील लेख. ही संकल्पना इतक्या सविस्तर व सोपेपणाने प्रा. शशिकांत गाडगीळ समजावून देतात की, अर्थशास्त्राचा परिचय नसणाराही लेख समजतो.

या स्मरणिकेत कोणकोणते विषय आले आहेत, हे अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना समजावे म्हणून ज्या ४ विभागांत लेख दिले आहेत त्यांची अनुक्रमणिकाच येथे देत आहे. उद्देश ही अनुक्रमणिका पाहून संबंधित अभ्यासकाला स्मरणिकेपर्यंत जावे न जावे ठरविता येईल.

### विभाग -१ - माहितीचे अर्थशास्त्र

माहितीचे अर्थशास्त्र : समीक्षकांचे निरीक्षण व विवेचन .......................... डॉ. अंजली कुळकर्णी

**पूर्ण निबंध**

१) संज्ञान युगातील श्रमबाजार ............................................................ प्रा. मंजुषा मुसमाडे

२) आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची कार्ये आणि असमवितिमाहिती -
दक्षिण-पूर्व आशियाच्या संदर्भात -एक अभ्यास........................................डॉ. राधिका लोबो
............................................................................... अनुवाद - रवींद्र शंकर जोशी

### विभाग -२ - खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण

खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण : समीक्षकांचे निरीक्षण व विवेचन ................. डॉ. वसंतराव जुगळे

**पूर्ण निबंध**

१) निर्गुंतवणूक धोरण : एक दृष्टीक्षेप ................................................ डॉ. दीपक बी. भामरे

२) भारतातील निर्गुंतवणूक धोरण : स्वरूप व परिणाम .................... प्रा. शशिकांत रामचंद्र गाडगीळ

३) शासननियंत्रित खाजगीकरणाची आवश्यकता .................................. डॉ. विलास खंदारे

४) खाजगीकरण : निर्गुंतवणुकीकरण आणि बिघडत चाललेले औद्योगिक संबंध ....... प्रा. म. बा. मुळीक

५) आजचे खाजगीकरण : श्रद्धेय मत की श्रेष्ठतर पर्याय ........................ डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार

६) निर्गुंतवणूक धोरण : दिशा व दशा ................................................ आर. एम. शिरसाठ

७) भारताचे निर्गुंतवणूक धोरण : सत्यता व भ्रम .................................. डॉ. विनायक देशपांडे

**गोषवारा**

१) सार्वजनिक उपक्रम : निर्गुंतवणुकीबाबत वास्तववादी धोरणाची आवश्यकता .... डॉ. आर.एस. साळुंके

२) सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक - एक अयोग्य धोरण ................................ प्रा. आर. के. जाधव

३) खाजगीकरणाची दिशा व दशा .............................. प्रा. एस. बी. सानप, प्रा. आर. बी. धांडे

४) निर्गुंतवणूक संकल्पना : सद्यस्थिती व समस्या ..................................... प्रा. एस. जे. पाटील

५) भारतातील निर्गुंतवणुकीकरण कार्यक्रम : एक आढावा ............................. प्रा. पां. ना. गावडे
कु. सीमा पां. गावडे

### विभाग -३ - छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक व सामाजिक विचार

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक व सामाजिक विचार :
समीक्षकांचे निरीक्षण व विवेचन ........................................................ डॉ. एम्. एन्. शिंदे

**गट १ - पूर्ण निबंध**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय
विचारवंतांच्या विचारांशी साधर्म्य .......................... प्रा. जे. एस. इंगळे, डॉ. एम. एन. शिंदे

२) राजर्षी शाहू महाराजांची आर्थिक कामगिरी ....................................... डॉ. रा. ना. भालेराव

**गोषवारा**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक व आर्थिक कार्य .....................प्रा. पी.एस. पायधन,
डॉ.ए.बी. सूर्यवंशी

२) राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार ............................... डॉ. श्रीरंग मंडले

३) छत्रपती शाहूंचे आरक्षणविषयक धोरण व आर्थिक विकास ................ प्रा. माधव मु. गायकवाड

४) छत्रपती शाहूंचे आर्थिक व सामाजिक विचार ................................ प्रा. सी. पी. करकरे

५) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार ......................... प्रा. रेखा दाते

६) छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार ................................ प्रा. अ. पा. संदे

७) राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार .................. प्रा. मोहन किसनराव चौधरी

८) छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक समतेचे अधिष्ठान .......................... प्रा. शकुंतला पाटील

९) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक व सामाजिक विचार ..................... प्रा. प्रदीप लाडके

१०) छत्रपती शाहू महाराज - आर्थिक सुधारणांचे प्रवर्तक........प्रा. सौ. कांचन मोरे व प्रा. बबनराव मोरे

११) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अर्थकारण..............................श्री. विजय शामराव मेटकरी,

श्री. कबीर पांडुरंग वाघमारे

**गट २ - पूर्ण निबंध**

१) राजर्षी शाहू महाराज व सामाजिक सुधारणा ....................................... डॉ. सुषमा देशमुख

२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि स्त्रीविषयक कायदे व स्त्रीशिक्षण ............. डॉ. टी.टी. उपाध्ये

प्रा. विद्या एस्. सुतार

**गट ३ - पूर्ण निबंध**

१) राजर्षी शाहू प्रेरित कामगार संघटना चळवळ : एक सैद्धांतिक आढावा ........... डॉ. निवास जाधव

२) छत्रपती शाहूंचे कृषीविषयक धोरण : एक चिकित्सक अभ्यास ................. डॉ. जी. एल. भोंग

३) राजर्षी शाहू महाराजांचे कृषी व कामगारविषयक विचार ........................... प्रा. निलेश दांगट

**गट ४ - पूर्ण निबंध**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज व शिक्षण ............... डॉ. जे. एफ. पाटील, श्री. आर. एस्. म्होपरे

२) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विकासाचे अर्थशास्त्र ................... प्रा. तानाजी गेनभाऊ गिते

३) शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार व कार्य ...................... डॉ. वसुधा पुरोहित-खांदेवाले

**गोषवारा**

१) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व कार्य ........................ प्रा. श्रीमती किरण वेळापुरे

**विभाग -४**

२) कॅनकून मंत्री परिषद आणि भारत .............................................. डॉ. व्ही. बी. भिसे

परिचय - संदीप बळे

# युवा वर्ग आणि सामाजिक बांधिलकी

*युवा वर्गाला सामाजिक बांधिलकी नसते, असे आपण म्हणतो. पण अभय बंग, प्रकाश आमटे अशी अनेक नावे आठवून पहा, आपण विचारात पडू ! - संपादक*

'पायी हळू हळू चाला, मुखाने मोरया बोला'
'कपाळी केशरी गंध गणेशा तुझा मला छंद'

दिवस होता अनंत चतुर्दशीचा आणि वेळ संध्याकाळची. गणेशनामाचा गजर जोरात सुरू होता. माईकवरून सतत अनेक सूचना येत होत्या. गणपती घरचा असो वा सार्वजनिक, लहान-मोठ्या सर्वांचाच विसर्जनाचा उत्साह दांडगा होता. तेवढ्यात माईकवरून एक पुसटशी सुचना ऐकू आली. लहान मुलगा हरवला होता ! त्याच नाव, सविस्तर वर्णन सांगितल्यावर १५-२० मिनिटांच्या अवधीतच तो मिळाल्याचे जाहीर केले. शोधकार्यात आघाडीवर असणाऱ्या NSS च्या पथकाचे अभिनंदन केले. केवळ गुण वाढावेत म्हणून ही मुले NSS मध्ये नाही जात तर त्यांच्यामध्ये समाजाला मदत करण्याची वृत्ती निर्माण व्हावी म्हणून शाळेमध्ये समाजसेवा, कार्यानुभव, स्काऊट-गाईड पथके, रस्ता सुरक्षा पथके इत्यादींद्वारे प्रयत्न केले जातात. समाजसेवकांच्या धड्यांचा अभ्यासक्रमात समावेश केला जातो. लहानपणापासून जेव्हा हे संस्कार घडले जातात तेव्हा युवापिढीमध्ये त्याची कार्यवाही आपोआप होत जाते. स्वतःहून मुले 'सिव्हील डिफेन्स', 'होम गार्ड', यासारखे शिक्षण घेण्यास उद्युक्त होतात.

जसं प्रवाहात सोडलेलं गोंडस फूल प्रवाहाच्या दिशेने कसलाही विचार न करता जातं, तसंच अनेकदा ह्या युवावर्गाचंही होतं. विचारांना आणि कृतीला योग्य दिशा मिळत नाही. पण त्यांना जर योग्य मार्गदर्शन मिळालं तर यशाचं मधुर चांदणं फार दूर नसतं. मग ते मार्गदर्शन आजीच्या गोष्टीतून मिळो, वा कॉलेजच्या प्राध्यापकांकडून. व्यक्तिमत्त्व विकासाच्या शिबिरातून मिळो, वा समाजाकडून! व्यवहारोपयोगी आणि समाजोपयोगी दोन्ही प्रकारचं शिक्षण ह्यात अंतर्भूत होतं. गरज असते फक्त प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची. कारण -

'मन चंगा तो कठौती में गंगा'

इथे प्रश्न मनाचा असतो. मन चंचल असतं. 'हाक मार साद देईन' म्हणणारं असतं. पण...

यौवनं धनसंपत्ति प्रभूत्वम् विवेकिता ।
एकैक्यमपि अनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥

म्हणजेच, तारुण्य, ऐश्वर्य, प्रभुत्व आणि अविवेक ह्यातील एकही गोष्ट सर्वनाशाला कारणीभूत ठरते, तर सर्वच असतील तर काय ?

तरुणपणी कधीतरी अविवेक अचानक जागृत होत असेलही ! पण आपण जिद्दी, महत्त्वाकांक्षी असतो. कोणतंही काम करण्याची प्रचंड इच्छा ह्या तरुण रक्तात सळसळत असते. रामायणात जसा दरवेळी कामात लहानसा का होईना, पण हातभार लावणाऱ्या चतुर आणि प्रेमळ खारूताईचा उल्लेख आढळतो तसा सहस्र शिळा 'हर हर महादेव' म्हणत पाण्यात सोडणाऱ्या शक्तिशाली वानरांचाही आढळतो. ह्या खारूताईची चतुराई आणि वानरांची प्रचंड शक्ती एकत्रितपणे जर कोणात सामावली असेल तर ती युवकांमध्ये. म्हणजेच काय? शक्ती आणि युक्तीचे मिलन म्हणजेच तारुण्य - हाच तो युवावर्ग !

डोंबिवलीतील एका नगरसेविकेच्या मुलाने रेल्वे ट्रॅकवरील एका लहान मुलाला वाचवल्याची बातमी काही महिन्यांपूर्वीच आपण वृत्तपत्रांत वाचली. डोळ्याला सोनेरी फ्रेमचा काळा 'गॉगल', उडणारे केस, एका खांद्यावर 'सॅक' टाकणारा, हवेत उडत असल्यागत वावरणारा एखादा तरुण

वृद्ध माणसाला रस्ता ओलांडून देताना, भाजीवालीची टोपली उचलून देताना आपण अनेकदा पाहतो. खेळाडूंच्या ग्रुपमध्ये एखादा अपंग मित्र एकटा पडू नये म्हणून आळीपाळीने त्याच्याशी गप्पा मारणारा मित्रपरिवारही कधीमधी दिसतो. जसे शिवाजीचे मावळे पाहिलेत, टस्कगीतले कार्व्हरला रताळ्याच्या शेतीत मदत करणारे निग्रो हात पाहिलेत तसाच आजचा युवावर्ग आहे. त्यांना गरिबी, जातीयता, अपंगत्व हे भेद नाही कळत ! भ्रष्टाचार, राजकारण ह्यांचे दुर्गंध त्यांना नसतात माहीत ! तेसुद्धा तुमच्या-आमच्यासारखे समाज, नीती मानणारे असतात. नववर्षाच्या सांस्कृतिक आणि आधुनिक दिंडीचे चैतन्य हे युवकच असतात. संस्कृती जतन करण्याची, सर्वांना भेटण्याची, विचारांच्या आदान-प्रदानाची ओढ त्यांनाच अधिक असते.

वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी समाजोद्धारासाठी ज्ञानेश्वरांनी प्राकृत मराठीत 'ज्ञानेश्वरी' रचली. तेही युवकच होते. पण विश्वाच्या कल्याणासाठी त्यांनी परमेश्वराकडे प्रसादाचे दान मागितले.

आजचा तरुण जरा 'मॉडर्न' झालाय. वेशभूषा, प्रवासाची साधने, समोर येणारी संकटे आणि संघर्ष बदलला आहे. ज्ञानाच्याही बाबतीत तो तसूभर पुढारलेलाच आहे. नवनवीन संकल्पनांचा खजिना त्यांच्याकडे आहे. त्यांच्या मनात एका कोपऱ्यातील समाजप्रेमाचा हा झरा आपल्याला प्रसंगी वाहताना दिसतो. इथे गरज असते उत्कृष्ट नेतृत्वाची. भिन्न भिन्न स्वभावाच्या लोकांना त्यांच्यातील आंतरिक एकतेला आवाहन करून एका कार्यात गुंफता येणे, यात प्रवर्तकाची खरी कसोटी आहे. एक सशक्त हेतू पूर्ण करण्यासाठी योग्य दिशा देणाऱ्या नेत्याची गरज असते. नेता होणं सोपं नसतं. जो नेता असतो त्याला दासांचा दास व्हावे लागते. हजार प्रकारची मनं सांभाळावी लागतात. जो अंतःकरणातुन सर्वांचा सेवक होऊ शकतो तोच खरा नेता. तोच समाजाची मनं ओळखून समाजऋण पूर्ण करण्यास तत्पर राहतो. हा समाज आपल्याला खूप काही देतो, पण परतफेडीसाठी उभं आयुष्य कमी पडतं. आपण कधीच शेवटी सर्वार्थाने कोणालाही मदत करत नसतो, जर काही करत असू तर ती फक्त सेवा.

आज अनेक थोर समाजसेवक सहयुवकांनी हे ऋण फेडतायेत. कुष्ठरोग्यांसाठी जागतिक स्तरावर दिल्या जाणाऱ्या 'डेमियन अँड डेरेन अॅवॉर्ड' विजेते बाबा आमटे ह्यांनी स्वेच्छेने, स्वकष्टाने 'आनंदवन' उभारले, फुलवले. परंतु आज त्यांचा वारसा त्यांची दोन्ही मुले - विकास आणि प्रकाश जपत आहेत. डॉक्टर होऊनही लहानपणापासून केले गेलेले संस्कार ते विसरले नाहीत आणि आज हेमलकसामध्ये नंदनवन बसवून सामाजिक बांधिलकी जपत आहेत. एम्.एस्. ला ९९% गुण मिळवून वैद्यकक्षेत्रात एक नवीन रेकॉर्ड बनवणारे, 'सर्च' चे संस्थापक डॉ. अभय बंग हे अमेरिकेहून गडचिरोलीला 'शोधग्राम' चे स्वप्न घेऊनच आले. त्या युवकाने संपूर्ण गडचिरोली ८०% न्यूमोनियाग्रस्त असताना प्रवेश केला आणि आज हे प्रमाण ४% वर आले आहे.

...असे अनेकजण समाजासाठी आपलं सर्वस्व अर्पण करत आहेत; हेच म्हणत -

'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने,
लब्धप्रकाश इतिहास निसर्गमाने
जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्ध्याची वाण धरिले करी हे सतीचे '

आज अनेक युवकांनी नेत्रदान, देहदान केले आहे. रक्तदान शिबिराला युवकांची उपस्थिती आजही चांगलीच आहे. आज आजीचा औषधांचा बटवा, गोष्टींचा खजाना हरवला असला तरीही तरुणवर्ग खरंच खूप संतुलित आहे. व्यक्तिमत्त्व विकासाच्या कार्यशाळेला आवर्जून उपस्थित राहणारा युवक व्यवहारी आहे. ज्ञानाप्रमाणेच भावनांनाही मान देतो आहे. आपलं कर्मक्षेत्र हेच त्याचं कुरुक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र आहे. नवनवीन संकल्पना राबवण्यासाठी, प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी आपलं तन-मन-धन अर्पून तो

प्रयत्न करतो आहे ... आणि तरीही समाजाचं आणि आपलं नातं तो विसरला नाही. प्रत्येकाने वृद्धाश्रमाला भेट द्यावी. अंध-मूकबधिरांच्या शाळेला वर्गणी द्यावी, हे तो जाणीवपूर्वक करत नसेलही कदाचित ! पण मान मात्र देत आहे. आणि या जगात मान आणि प्रेम आहे म्हणूनच उद्याची आशा उज्ज्वल भविष्य दाखविणारी आहे.

स्वामी विवेकानंदांची एक खूप छान गोष्ट नेहमी सांगितली जाते. शिकागोत असताना स्वामीजींचे वास्तव्य सौ. लुईस यांच्याकडे होते. एकदा बाहेरून आल्यावर स्वामीजी त्यांना म्हणाले, 'आज मी एका खूप मोठ्या मोहात पडलो आहे' शुक्रासारखे वैराग्यपूर्ण जीवन जगणाऱ्या स्वामीजींच्या तोंडून हे उद्‌गार ऐकून आश्चर्यचकित होऊन त्या थट्टेने म्हणाल्या, 'कोण आहे ती भाग्यवान स्त्री?' त्यावर स्वामीजी म्हणतात, 'ती कोणी युवती नाही. ती आहे पाश्चात्यांकडे असलेली संघटनाशक्ती. कोणतेही काम खूप सुंदरतेने प्रदर्शित करण्याची वृत्ती.' आजही आपल्याकडे चार डोकी एकत्र आली की वाद होतात, लहानसहान गोष्टींवरून भेदाभेद होतात, विरुद्ध विचारप्रवाह तयार होतात; पण ह्याचा काय उपयोग? खरं तर, विरुद्ध विचार असूनही एकत्रितपणे काम करताना विनम्रता, आज्ञापालन फार महत्त्वाचे आहे. अनेक विचारप्रवाहांतून एक विचारप्रवाह होणे फार गरजेचे आहे. त्यांना फाटे फुटून कसे चालेल? अनेक नद्या एकत्र समुद्राला मिळूनच यशस्वीतेचा प्रवास करतात. येशू म्हणतो, ' मागा म्हणजे मिळेल, शोधा म्हणजे गवसेल आणि ठोठवा म्हणजे उघडेल'. ह्या युवकांसाठी ईश्वरचरणी फक्त एवढंच मागता येईल-

"तव अमृतवाणी हाक देत आम्हाते
रे अतुलबलस्वी करू हिंदूराष्ट्राते
युवाशक्ति हवी मज कार्यशरण पुरुषार्थी
हे युवकप्रवर, तू युवहृदयांची स्फूर्ती !"

**स्नेहल संजीव मुळे**
बा. ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे
प्रथम वर्ष विज्ञान शाखा (पदवी)

*(पान क्र. ७ वरून)*

## श्री गुरुदेव दत्त !

शंभर वर्षानंतर लिहिला गेला आहे. या ग्रंथाच्या एकावन्नाव्या अध्यायात असा उल्लेखही आहे.

कन्यागति बृहस्पति । बहुधान्य संवत्सरी ख्याती ।
सूर्यचाले उत्तरागती । संक्रान्ती कुंभ परियेसा ।
शिशिर ऋतु माघमासी । असति पक्ष प्रतिपदेसी ।
शुक्रवार पुण्य दिवशी । श्री गुरु बैसले निजानंदी ।

असा निजानंदी झाल्याचा उल्लेख आढळतो.

श्री दत्त समन्वयवादी दैवत आहे. भारतातल्या बहुतेक ठिकाणी दत्तसंप्रदायातील मंडळी आढळतात. चार-पाच प्रांतात तर श्री दत्ताची प्रसिद्ध स्थाने आहेत. या दत्त उपासकांत इतर अनेक उपासना पंथांना श्री दत्त आपले वाटतात. दत्त ठराविक काळापुरता अवतार नसून अखंड त्याचे वास्तव्य सर्वत्र आहे. दत्तावतारी मंडळी याचा प्रत्यय देत आहेत. असा समन्वयवादी सर्वांना हवाहवासा वाटणारा श्री दत्त सर्वांना सद्‌बुद्धी देवो, ईश्वरनिष्ठा वाढवो, एवढीच श्री दत्तचरणी प्रार्थना.

इतिशम् ।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड, ठाणे.

•••

दिशा
नियमित वाचा
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# राजकीय अराजकता : धार्मिक की आर्थिक

*यंदाच्या कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील पदवी गटातील एक उल्लेखनीय भाषण. - संपादक*

भारत स्वतंत्र झाला त्यावेळच्या राजकीय नेत्यांनी व त्याचबरोबर सर्वसामान्य भारतीय नागरिकांनीही स्वतंत्र भारताविषयी काही स्वप्नं बाळगली होती, परंतु भारतीय स्वातंत्र्याचा गेल्या ५६ वर्षांचा इतिहास हा या स्वप्नभंगाचाच इतिहास झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

भ्रष्टाचार, दहशतवाद, लहान-मोठे गुन्हे इ. च्या सावटाखाली एकंदरीतच असुरक्षित जीवनशैलीत भारतीय नागरिक जगत आहेत आणि यात सर्वांत महत्त्वाची आहे, ती राजकीय अराजकता.

राजकीय अराजकता म्हणजे राजकारणाच्या क्षेत्रातील गोंधळाची परिस्थिती; ज्यात राज्यव्यवस्था चालवणारा खंबीर सूत्रधार नाही, धोरणे नाहीत, धोरणे आखली तरी ती राबविण्यात सुसूत्रता नाही आणि या एकूणच परिस्थितीबद्दल सर्वत्र पसरलेली उदासीनता म्हणजे अराजकता होय.

साधारणत: स्वातंत्र्यदिन, निवडणुका जवळ आल्या की, त्या निमित्ताने नव्या योजना जाहीर करायच्या आणि मग त्या विसरून जायच्या, हा परिपाठ आपल्या देशात कित्येक वर्षे चालू आहे. साक्षरता, आरोग्य, योजना जाहीर करायच्या आणि त्या योजनांचा परिणाम मात्र शून्य आहे असेच चित्र दिसते.

या अशा राजकीय अराजकतेची कारणे कोणती धार्मिक की आर्थिक ? माझ्या मते राजकीय अराजकतेच्या मागे मुख्य कारण आर्थिक असले तरी त्याला धार्मिकतेची किंवहुना धर्मांधतेची किनार आहे.

या राजकीय अराजकतेमागची आर्थिक कारणे - जर प्रामुख्याने विचारात घेतली तर कोणत्याही अर्थव्यवस्थेचा म्हणजेच त्या देशाचे वा राज्यकर्त्या पक्षाचे आर्थिक तत्त्वज्ञान होय. पण आज आपल्या देशाचे वा देश चालवू पाहणाऱ्या कोणत्याही पक्षाचे स्वत:चे असे आर्थिक तत्त्वज्ञान व आर्थिक विचारप्रणाली नाही.

दरवर्षीचे अंदाजपत्रक मांडताना आमचे माननीय अर्थमंत्री वेगवेगळी धोरणे जाहीर करतात. पण वर्षभर त्यांचा मागमूसही राहत नाही. अर्थशास्त्राशी काडीमात्र संबंध नसलेल्या व्यक्ती देशाच्या अर्थमंत्री झाल्यावर त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नाही.

आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारताने प्रवेश केला असून देशाच्या आर्थिक धोरणांत मात्र सुसूत्रता नाही. जागतिकीकरणाबाबत भारताची ठोस भूमिका अजूनही सुस्पष्ट नाही.

पेप्सी, कोका-कोलासारख्या परदेशी कंपन्यांना आधी परवाने द्यायचे, नंतर त्यांनी आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केल्यावर त्यांच्यावर बंदी आणण्याची घोषणा करायची, पण नंतर काही दिवसांनी या घोषणांचा थांगपत्ताही नसावा अशी परिस्थिती आहे.

आज चिनी वस्तूंनी भारतीय बाजारपेठेत पद्धतशीरपणे घुसखोरी केली आहे. संपूर्ण भारतीय बाजारपेठ परदेशी वस्तू काबीज करू पाहत आहेत. म्हणजेच आज नवा आर्थिक वसाहतवादच भारतात रुजू पाहत आहेत. आर्थिक कारणांनी आलेला हा वसाहतवाद दूर करणे कठीण आहेच, पण त्यासाठी स्वत:ची अशी जी खंबीर भूमिका हवी, ती मात्र भारतीय नेत्यांपाशी नाही.

१ ली पंचवार्षिक योजना जे यश प्राप्त करू शकली तसे अपेक्षित यश नंतरच्या योजनांना मिळाले नाही. औद्योगिकरणाबाबत म्हणावे तर त्यातही पद्धतशीर धोरण दिसत नाही. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या उद्योगांत परस्परपूरकता घालून द्यायचे कार्य सरकारच्या हातून व्हावे, अशी अपेक्षाही पूर्ण होत नाही.

याउलट पंतप्रधानांनी प्रतिनिधित्व केलेली कँनकून परिषद फसते, चीन दौरा औपचारिक-अनौपचारिक गप्पांतच संपतो. पाकिस्तान-भारताची शिष्टमंडळे करत असलेल्या परस्पर दौऱ्यांना पिकनिकचे स्वरूप प्राप्त होते. अनिवासी भारतीयांसमोर गुंतवणुकीसाठी खुद्द पंतप्रधान साकडं घालतात तरी पदरात काही पडत नाही.

याला कारण म्हणजे, आपल्या देशाचे स्वत:चे असे आर्थिक तत्त्वज्ञानच नाही. ज्याने अराजकता ही फोफावतच जाते व आपले राजकीय नेते मात्र मोबाइल कंपन्यांशी संधान साधत स्वत:ला मोबाइल पुरुष, लोहपुरुष, संपूर्ण पुरुष म्हणवून घेण्यातच धन्यता मानतात, जिथे संधी मिळेल तिथे commission खातात. आणि मग लष्कराच्या शवपेट्यांत भ्रष्टाचार होतो, सैनिकांसाठी खरेदी केलेल्या Bullet Proof जॅकिटस्‌मध्ये AK-47 ची गोळी थोपविण्याची क्षमता नसते आणि मग सैनिक सीमेवर जिवानिशी मरतात आणि संरक्षणमंत्र्यांच्या तिजोऱ्या भरतात.

समाजवादी मूल्ये, कल्याणकारी राज्ये ही नेहरूंची धोरणे तर आम्ही कधीच बासनात गुंडाळली आहेत. केंद्र सरकारच्या उपपक्षांत एकमत नाहीच, पण राज्य सरकारांचीही फार वेगळी परिस्थिती नाही. आपापल्या राज्यातील अराजकसदृश परिस्थितीत बदल करण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी संसदेत, विधानसभेत एकमेकांवर खुर्च्या फेकण्यातच धन्यता मानणारे आमचे संसदपटू देशाचे नेतृत्व करत आहेत, याहून वाईट गोष्ट नाही.

राजकीय अराजकतेला कारणीभूत होणाऱ्या आर्थिक कारणांवर नियंत्रण ठेवणारा सुस्पष्ट विचारांचा प्रभावी नेता हवा. पण हे शहाणपण अजूनही कोणत्याही पक्षाला सुचलेले नाही. याउलट या अराजकतेत भर घालण्यासाठीच की काय तर यात धार्मिक कारणांचीही भर पडली आहे. हे जास्त गंभीर आहे की, धार्मिकता हा राजकीय अराजकतेचा पाया ठरू पाहत आहे.

'धर्म हे राज्यकर्ता वर्गाच्या हातातील हत्यार असेल व ते त्याचा स्वार्थसाधनेसाठी हुशारीने वापर करून घेतील' असे कार्ल मार्क्स १५० वर्षांपूर्वी सांगून गेला, जे आज तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे.

Good Governance वर विश्वास ठेवणारी नेहरूंची पिढी मागे पडून गोत्र, जात, धर्म, वंश इ. वर अनन्यसाधारण विश्वास ठेवणारी पिढी राजकारणात आली व यातूनच राजकारणातील धर्माचे प्राबल्य अतोनात वाढले.

सत्तारूढ पक्ष सत्ता टिकविण्यासाठी व सत्तावंचित पक्ष सत्ता मिळविण्यासाठी धर्माचा वापर करतात. कुंभमेळ्यासारख्या गोष्टींवर करोडो रुपये खर्च केले जातात. निवडणुकांत यश मिळविण्यासाठी महापूजा, महाआरत्याही केल्या जातात. मुंबईचे शांघाय करताना एका बाजूला २५ लाखांच्या दहीहंड्याही उभारल्या जातात.

संविधानाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतरही धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाची लक्तरे लोकशाहीच्या वेशीवर टांगली जातात. वादग्रस्त जागी मंदिर-मशीद बांधण्यासाठी हट्ट धरणाऱ्यांनी हे लक्षात घ्यायला हवे की, यापेक्षा कितीतरी जटील, बुनियादी प्रश्न भारतासमोर उभे आहेत. भारतातील २६ कोटी लोकांना दोन वेळचे धड जेवायलाही मिळत नाही. सर्वाधिक दारिद्र्यरेषेखालील लोक खुद्द रामजन्मभूमीवरच नांदत आहेत. अशा परिस्थितीत देशाला गरजआहे ती शाळा, रुग्णालयांची, रोजगार निर्मिती


(पान क्र. २२ वर)

# प्रवास

*जीवनप्रवासातील वेगवेगळे टप्पे या लेखात आहेत. - संपादक*

एक इंग्रजी उक्ती आहे की, 'Life is always going on, it has no limit.' जीवनाचा प्रवास अखंडपणे चालू असतो. त्याला मर्यादा किंवा अंत नाही. माणसाच्या जन्माला अंत आहे, पण जीवनाला अंत नाही. माणूस जन्माला आला की लगेच त्याची मृत्यूकडे वाटचाल सुरू होते. या वाटचालीत तो अनेक प्रकारचे प्रवासाचे टप्पे गाठत असतो. क्वचित त्या प्रवासाची पुनरावृत्तीही होत असते. एक प्रवास मात्र त्याच्या जीवनात फक्त एकदाच घडतो. त्याची पुनरावृत्तीही कधीही होत नाही. तो प्रवास म्हणजे मातेच्या गर्भातून या जगात प्रवेश घेणे. त्यानंतर त्याच्यापुढे जीवनाची विशाल वाटचाल उभी ठाकलेली असते. आणि या जगात आल्यावर पहिला श्वास घेतल्यापासून शेवटचा श्वास घेईपर्यंत त्याची ही वाटचाल चालूच असते. किंबहुना त्यानंतरही त्याचा जीवनप्रवास वर सांगितल्याप्रमाणे चालूच राहतो. शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे 'पुनरपि जननम्, पुनरपि मरणम्, पुनरपि जननी जठरे शयनम्' असा त्याचा क्रम अबाधितपणे चालू असतो.

पण एकदा मृत्यूचा टप्पा ओलांडला की परत जन्माच्या टप्प्याला येईपर्यंत आत्म्याला बऱ्याच बऱ्या-वाईट स्थितीतून जावे लागते. आपल्या हिंदूधर्मात याबद्दल विस्तृत विवेचन केलेले आहे. नशिबात लिहिलेले सारे क्लेश भोगून आत्मा परत मानवजन्मासाठी सिद्ध होतो. हाही एक प्रवासच आहे. कालचक्र आपल्या गतीने अबाधितपणे फिरत असते व माणूस आणि सर्व चराचर सृष्टी त्याला बांधलेली असते. गाडीच्या चाकाबरोबर नळ्यासारखी फिरत असते.



नुकतेच जन्मलेले मूल आपल्या मातेच्या गर्भातला पहिला प्रवास आटोपून या जगात पाऊल टाकते, त्यावेळी सर्वस्वी पराधीन, अप्रगत, असंस्कृत आणि दुर्बल असते. त्याच्या बुद्धीचीही तितकीशी वाढ झालेली नसते. या जगात आल्यावर हळूहळू अशक्ततेकडून सशक्ततेकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे, पराधीनतेकडून स्वाधीनतेकडे, अशिक्षिताकडून, सुशिक्षितपणाकडे, चांगल्या सवयी बाणवून घेण्याकडे त्याचा कल वाढू लागतो, म्हणजेच प्रगतीच्या दिशेने प्रवास सुरू होतो.

कुठलाही प्रवास म्हटला की त्याची पूर्वतयारी करणे आलेच. जन्माला आल्यावर जेमतेम हात-पाय हलवू लागणारे व रडू लागणारे मूल हळूहळू शैशवावस्थेत आल्यावर दुडूदुडू धावू लागते, तोंडाने बोलू लागते, माणसे ओळखू लागते. या त्याच्या प्रगतीत आई-वडिलांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा असतो. त्याशिवाय प्रगती होणे अशक्यच.

काही आपल्याला आलेल्या अनुभवांनी, तर काही माता, पिता, गुरू व आप्तेष्टांनी शिकविलेल्या गोष्टींनी माणूस आपल्या पुढल्या प्रवासाची तयारी करीत असतो. दिशा ठरवत असतो. त्याला मुद्दाम प्रवास करावा लागत नाही. तो आपोआप घडतच असतो. बाल, शैशव, तरुण, वृद्ध या अवस्थांमधून जाण्यासाठी त्याला वेगळे कष्ट करावे लागत नाहीत. कष्ट करावे लागतात



ते या सर्व अवस्था सुखकारक कशा होतील यासाठी ! आपले जीवन इतरांच्या भल्यासाठी कसे खर्ची घालता येईल, दुसऱ्यांचे दु:ख कमी कसे करता येईल, जीवनात सर्वत्र काळेकुट्ट, निराश वातावरण असलेल्यांच्या जीवनात आनंदाचा, समाधानाचा प्रकाश कसा पाडता येईल यासाठी जे आपल्या जीवनात प्रयत्न करतात ते खरोखरीच सत्पुरुष म्हणण्याच्या लायकीचे ठरतात. अशांना आपण संत म्हणून मान देतो व त्यांच्यापुढे नतमस्तक होतो. त्यांचा जीवनप्रवास सुखकर नसतो, पण ते इतरांच्या जीवनप्रवासातील मार्गप्रदीप ठरतात. हे खरे जीवन ! हा खरा प्रवास!

चांगल्या संस्कारांनी मनुष्य सुसंस्कृत घडतो, पण यासाठी बरेच कष्ट करावे लागतात, मेहनत घ्यावी लागते. अशी सुसंस्कृत माणसे स्वत:चे व आपल्या आसपासच्या लोकांचे जीवन सुखकर करतातच; पण कधी-कधी हा प्रवास उलटाही घडतो. माणूस वाईट सवयींच्या नादी लागला तर आपल्या स्वकियांचे व आपलेही जीवन बरबाद करतो. यातही मुख्य गोष्ट अशी की, चांगल्या सवयींसाठी खूप मेहनत घ्यावी लागते. वाईट गोष्टी, सवयी मात्र माणूस आपोआप आत्मसात करतो. त्या मुद्दाम शिकवाव्या लागत नाहीत.

बालपणाचा काळ सुखाचा असतो. पण हाच काळ जीवनात अतिशय महत्त्वाचा असतो. माणूस सुसंस्कृत, परोपकारी की स्वार्थी, व्यसनी होणार होणार हे याच काळात ठरते. आपल्या पुढील प्रवासाची ही शिदोरी असते. ही शिदोरी जितकी सकस, पुढचा प्रवास तितकाच सुखकर. पुढील प्रवासातील खाच-खळगे या पुण्याईने भरून जातात व मार्ग निष्कंटक करतात. शैशवापाठोपाठ येणाऱ्या कुमारवयात माणसाच्या शरीर व मनात फार मोठे बदल होत असतात. या मानसिक व शारीरिक बदलाची परिसीमा तारुण्यात गाठली जाते.



कुमारवय ते तारुण्य या काळात मन जणू कधी ओल्या हिरव्यागार गवतावरून हळुवारपणे मंद पावले टाकीत असल्यासारखे वाटते. पण मागे सांगितल्याप्रमाणे नैराश्येच्या खाईत पडून असह्य आक्रोशही करत असते. ही अवस्था काहींच्या बाबतीत घडते जे जीवन म्हणजे स्वार्थाचा बाजार समजतात. प्रयत्न केल्यास ते या अवस्थेतून या वयात बाहेर येऊ शकतात. पण हे ज्याच्या-त्याच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे.

कुमारवय व तारुण्य यांच्यामधील अवस्था पौगंडावस्था. या पौगंडाच्या प्रवासात सर्व जीवनाची मूल्ये, नीतिमत्ता यांची जाणीव झालेली असते व त्यांचा पुरेपूर उपयोग करण्याची वृत्ती या वयात होते. या अवस्थेतील प्रवास कधी डोंगरदऱ्यामधला खडक-काट्यांचा असतो, तर कधी मऊसूत स्पर्श होताच फुटून नाहीसे होणाऱ्या फेसाळणाऱ्या लाटेसारखा मुलायम असतो.



साऱ्या जगाबद्दल एक प्रकारचे कुतूहल वाटू लागते. डोळ्यांवर रंगीबेरंगी चष्मा चढवल्यासारखी जगातील प्रत्येक गोष्ट विविधरंगी भासू लागते. दु:ख ही एक कवीकल्पना वाटू लागते. तारुण्यावस्था उपभोगताना ह्या साऱ्या भावना आणखी तीव्र होऊ लागतात. माणसाला मुळी हे पटतच नाही की सध्या जगत असलेले हे तारुण्य परत कधीच येणार नाही इतका बेफामपणा ! लाथ मारीन तेथे पाणी काढीन ही वृत्ती त्याच्या प्रवासाची पुढची पायरी खदखदत पहात असते. ही अवस्था त्याला कुत्सितपणे हसत सांगत असते की, तुझी ही अवस्था एकदा गेली की परत येणार नाही आणि मी मात्र आले की परत कधीच जाणार नाही आहे. तू कायमचा माझा सोबती असणार आहेस. पुढचा प्रवास माझ्याच संगतीनं ! ही अवस्था वृद्धावस्था. माणसाला जेव्हा या स्थितीची जाणीव होते



तेव्हा तो आपला प्रवास आटोपता घेण्याच्या तयारीला लागतो. शेवटच्या मुक्कामाची ध्वजा हाती घेऊन पुढे पाऊल टाकू लागतो. मनाची समजूत घालू लागतो. इतके दिवस केले तेवढे बस्स झाले. आता मन व शरीर दोन्ही थकले. पुण्य, पुण्य ज्याला म्हणतात ते पदरात पाडून घ्यावे म्हणजे झाले ! देवदर्शन, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा यात उर्वरित जीवन घालवावे अशी त्याला ओढ लागते. कुणाच्या तरी उपयोगी पडावे, आपल्या अनुभवाचा, ज्ञानाचा इतरांना फायदा करून द्यावा असे वाटू लागते. हा प्रवासाचा शेवटचा टप्पा. पण शेवटचा कसा ? पुनरपि जननम् आहेच की. माणूस मेला तरी त्याचा पुढचा प्रवास चालूच असतो.

एवढे मात्र खरे की, मनात असो वा नसो, मानवजन्म मिळो न मिळो, प्रत्येक सजीव-निर्जीवाला प्रवासाशिवाय पर्याय नाही. यापैकी कोणत्या अवस्थेत आपल्या प्रवासाचा शेवट आहे हे मानवाला कधीच कळत नाही. नियतीने माणसाच्या हातात दुऱ्या-तिऱ्याच ठेवून आपल्या हातात एक्का, राजा-राणी घेतले आहेत. त्यामुळे मानव हा खेळ कधीच जिंकू शकणार नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते -

अरे प्रवास, प्रवास जसा दैवाचा दास.
मिळे त्यास मुक्ती जर प्रवास करिती खास.
अंधारातुनी प्रकाशाकडे, वारे वाहती प्रवासाचे.
साध्याकडूनी असाध्याकडे, जीवन होई परिपूर्णतेचे.

**सौ. आरती राघव कुलकर्णी**
परेरा नगर, बिल्डिंग नं. ७,
अ-१४, खोपट, ठाणे (प.)

(पान क्र. ११ वरून)

## राजकीय अराजकता : धार्मिक की आर्थिक

केंद्रांची, विहिरी-तलावांची अन् वसतिगृहांची-अनाथालयांची. पण यासाठी प्रयत्न करण्याऐवजी आमच्या नेत्यांचे लक्ष मात्र अयोध्या प्रश्न अधिकाधिक चिघळत ठेवण्याकडे आहे.

अशाप्रकारे देशाचे राजकारण अराजकतेच्या उंच कड्यावर येऊन पोहोचले असताना खोल गर्तेत कोसळण्याशिवाय दुसरा पर्यायच नाही का? केवळ हा राज्यकर्ता वर्गच लोकशाही समाजाचा निर्णायक तारणहार असतो का? विद्यमान शासनपद्धतीला अधिक चांगला पर्याय ठरू शकेल अशी दुसरी पद्धत अंमलात आणता येईल काय? या सर्वच प्रश्नांचा व तद्‌अनुषंगाने राजकीय अराजकतेचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

संसद, न्यायमंडळ, प्रशासन व वृत्तपत्रे या लोकशाहीच्या ४ आधारस्तंभांना अराजकतेच्या गर्तेत जाण्यापासून वाचवायला हवे. हो सूरी अन् मार उडी करण्यापेक्षा साधकबाधक, समंजस, सहिष्णू वृत्तीने विचार करून समाजाची पूर्नरचना बांधायला हवी. या कार्यात सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग व्हायला हवा. हे सर्व करणे कठीण आहे, पण या जगात अशक्य काहीच नाही.

**मानसी मधुकर मुळीक**
तृतीय वर्ष (कला)
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर.
(नी. गो. पंडितराव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा - २१-९-२००३)

# मरावे परी कीर्तीरूपे उरावे !

*कै. जयवंत दळवी या प्रतिभावान साहित्यिकाचा स्वर्गातला प्रवेश ही कल्पना करून हा ललित लेख लिहिला आहे. अपवाद म्हणून सदर लेख आम्ही घेत आहोत - संपादक*

(कै. जयवंत दळवी यांच्यावर जरा विनोदी अंगाने लिहिलेला लेख त्यांची क्षमा मागून !)

१९९४ चा कै. जयवंत दळवी यांच्यावरील ललितचा 'दळवी' विशेषांक संपूर्ण वाचला नि रात्री स्वप्नात दिसलं -

रेड्यावर बसलेले यमराज दळवींना आपल्यापुढे बसवून आकाशमार्गाने जात आहेत. विमानांच्याही वरून जाणाऱ्या या मार्गावर उंदीर, मोर, सिंह, वाघ, नंदी, गरूड अशा देवदेवतांच्या वाहनांची वाहतूक, (माणसांची वाहने तिथवर अजून पोहोचलेली नाहीत म्हणून) देवदूत, दास-दासी, भालदार-चोपदार म्हणजे देवांचे द्वारपाल, अंगरक्षक वगैरे वगैरे लोकांची तुरळक ये-जा चालू होती. ट्रॅफिक जाम होण्याची भीती नसल्यामुळे ट्रॅफिक कंट्रोल, ॲटोमॅटिक लाइट, ट्रॅफिक पोलीस तिथे दिसत नव्हते. सारं कसं शांत शांत... वाहनांचा खडखडाट, धडधडाट, कर्णकर्कश, हॉर्न्स, धूर, ध्वनी आणि धुळीचं प्रदूषण नाही. पादचाऱ्यांचा गलका, गोंगाट, गडबड, गोंधळ काहीच नाही. सारं कसं शिस्तीत, संथ लयीत (कारण कोणालाच वेळेचं बंधन पाळायचं नाही की आठ तेराची फास्ट लोकल गाठायची नाही.) बिनबोभाट चाललेलं.

दळवींना इथली शांतता, शिस्त, इथलं प्रदूषणरहित वातावरण सारंच आवडलं. ते मनाशी म्हणाले, इथे पहाटे उठून स्मशानाच्या बाजूला समुद्रावर फिरायला जायला नको चिंतन-मननासाठी. कारण इथे सगळीकडेच स्मशानशांतता आहे. पण एक गोष्ट मात्र त्यांना खटकली, इथे रस्त्यातली एकही व्यक्ती 'हे पहा दळवी चाललेत' म्हणून त्यांच्याकडे बोट दाखवून आपापसांत कुजबूजताना दिसली नाही. (पृथ्वीवरच्यासारखी !) हा त्यांना घोर अपमान वाटला व वाईट वाटलं नि चुकल्यासारखं पण वाटलं. (कारण त्यांना इथली सवय होती ना लोकांच्या आदराच्या, आपुलकीच्या नजरांनी पुलकित नि कृतकृत्य होण्याची.)

शेवटी एकदाचं पापपुण्याचा निवाडा करणारं चित्रगुप्ताचं कोर्ट आलं. प्रकृती अस्वास्थ्यामुळं एवढ्या (रेड्यावरच्या प्रवासाची सवय नसल्यामुळे) प्रवासाचेही दळवींना श्रम झाले. पण न्यायनिवाडा झाल्याशिवाय त्यांना विश्रांती घेता येणार नव्हती. कारण मुक्काम कोठे करायचा, ते चित्रगुप्ताच्या दरबारात अजून ठरायचे होते. चहापाण्याची पृथ्वीसारखी इथे सोय दिसत नव्हती.

चित्रगुप्ताच्या दालनापाशी सोडून यमराज निघून गेले होते. आत भली मोठी लाइन लागली होती. मुंबईकर दळवींना लायनीची तशी सवय होती. पण आजकाल प्रकृती अस्वास्थ्यामुळे लायनीशी त्यांचा संबंध येत नव्हता. दमलेले थकलेले दळवी पाणी प्यावे म्हणून खांद्यावरील शबनममधून उकळलेल्या पाण्याची बाटली बाहेर काढायला जातात, पण त्यांच्या लक्षात येतं की शबनम, बाटली सर्व तिकडेच विसरले आहेत. आता नुसती हवा खाऊन (फार तर दातओठ खाऊन) गप्प बसण्याशिवाय गत्यंतर नसते. तरी दळवी जिकिरीला येऊन एकदम ओरडतात, 'अहो, इथे कोणी आयोजक, प्रायोजक, संयोजक वगैरे आहेत की नाहीत?' कारण त्यांना आजवर सगळीकडे स्वागताला, दिमतीला आयोजक, प्रायोजक, संयोजकांची सवय होती. (जरी ते जास्त कार्यक्रमाला जात नसले तरी जेथे जात तेथे) त्यांच्या आवाजाने शांततेचा भंग होऊन काही लोक

(लायनीतले) मागे बघतात. चित्रगुप्ताचे सेवक त्यांच्याकडे धावत येतात. 'काय गडबड आहे? कोण तुम्ही ? कशाला आरडाओरडा करता? मुकाट्यानं लायनीत उभे राहा' आता दळवी चिडतात. ते एकदम रागाने म्हणू लागतात, 'आम्ही कोण म्हणून काय पुसता, आम्ही असू लाडके देवाचे'.

मागे गडबड चाललेली पाहून चित्रगुप्त संतप्त होतो 'कोण आहे तो त्याला इकडे घेऊन या.'

दळवींना चित्रगुप्तापुढे नेलं जातं.

'काय गडबड आहे ? कोण आहेस तू?' चित्रगुप्त.

दळवी पुन्हा मघाच्याच ओळी पुटपुटतात.

'महाराज, हे पृथ्वीवरचे नामवंत लेखक, नाटककार, कादंबरीकार जयवंत दळवी आहेत.' चित्रगुप्ताचा पृथ्वीवरचा एक वार्ताहर सांगतो. 'पण हे नास्तिक आहेत महाराज. यांनी कधी पूजापाठ, जपजाप्य, एवढंच काय देवदर्शनही केलेलं नाही. मग हे देवाचे लाडके कुठले असायला?'

'हे केशवसुतांच्या कवितेच्या ओळी म्हणाले. 'आम्ही असू लाडके देवाचे' हे म्हणणे केशवसुतांनाच शोभते, कारण ते अस्तिक होते. या दळवींना नाही.' एक वृद्ध जुना वार्ताहर (रिटायर्ड झालेला) बोलतो.

'इथल्यापेक्षा पृथ्वीवर खूप बरं असतं. मानसन्मान, आदरसत्कार आणखी खूप काही. इथे पाण्याविना माझा जीव चाललाय. (तो ऑलरेडी गेलेला होता तरी) माझं ब्लडप्रेशर वाढलंय. मला अस्वस्थ वाटतंय, माझ्या दुखण्यापाण्याची काळजी घेणारी बायको पण नाहीय बरोबर. लवकर काय ते आटपा. उद्या माझा डायलिसिसचा वार आहे. सकाळी नऊला अपॉइंटमेंट आहे माझी.' दळवी कासाविशीला येऊन म्हणतात.

'तुम्ही केशवसुत असा नाहीतर दळवी, इथे पापपुण्याच्या निवाड्याची लाइन एकच. तो निवाडा झाला की मग प्रत्येकाला त्याच्या इतमामाप्रमाणे दर्जा व वागणूक मिळते. तेव्हा दळवीसाहेब, तुम्हाला तोवर या लायनीतच उभं राहलं पाहिजे. त्याला इलाज नाही.' चित्रगुप्त दळवींच्या खांद्यावर थोपटत म्हणतो.

'अहो इथं मानमरातब जाऊ दे, साधं पाणी मिळेल का? घसा कोरडा झालाय माझा. चक्कर येईलसं वाटतंय. किडनी फेल गेलेला पेशंट आहे हो मी.' दळवी चित्रगुप्ताला घामाघूम होत म्हणतात. 'दळवी साहेब, इथे कोणाला पाणी वगैरे काही लागतच नाही. इथे फक्त अमृत मिळतं प्यायला. पण ते न्यायनिवाड्यानंतर. तुमची स्वर्गात रवानगी झाली तर ! आणि तुम्ही ते किडनी पेशंट आहे म्हणालात, डायलिसिसचा वार म्हणालात तसलं काहीही येथे तुम्हाला करायला लागणार नाही. त्या साऱ्यापासून तुम्ही मुक्त झाला आहात. तुम्हाला आता कसं पिसासारखं हलकं हलकं वाटायला पाहिजे. बरं मी आता कामाला लागतो. लोक खोळंबले आहेत लायनीत.' चित्रगुप्त आर्जवून म्हणाला.

ही पृथ्वी असती तर एव्हाना लोकांनी रणांगण केलं असतं. खोळंबा झाला म्हणून. रेल्वेच्या गाड्यांचा खोळंबा प्रकारामुळे संतप्त प्रवाशांची जाळपोळ, तोडफोड, दगडफेक प्रतिक्रिया दळवींना आठवली व इथलं शांततापूर्ण वातावरण दळवींना बरं वाटून गेलं.

दळवी अखेर नाइलाजानं लायनीत उभे राहतात. आता त्यांना जाणवतं की आपल्याला तहान लागली नाहीये, घामबिम येत नाहीये, आपल्याला चक्कर येत नाहीये, काहीच होत नाहीये. चित्रगुप्त साहेब म्हणाले त्याप्रमाणे हलकं हलकं वाटतंय. पृथ्वीवरच्यापेक्षा छान, काहीतरी वेगळं, निराळं वाटतंय.

बराच वेळ मार्गप्रतीक्षा केल्यावर त्यांचा नंबर येतो. चित्रगुप्तासमोर, भलीमोठी वही उघडून त्यांचा सेवक प्रत्येकाच्या पापपुण्याचा पाढा वाचून दाखवीत असतो.

दळवींच्या नावाचे पान काढून तो वाचू लागतो -

'श्रीयुत दळवींनी आतापर्यंत अनेक कथा, आणि त्या कादंबऱ्यांचीच नाटके, विनोदी लेखन वगैरे करून जनतेची करमणूक, मनोरंजन केलेले आहे. म्हणजे एकप्रकारे जनता जनार्दनाची सेवाच केलेली आहे. सामाजिक बांधिलकीचे ऋण त्यांनी उत्तमप्रकारे फेडलेले आहे. पण हे वृत्तीने नास्तिक आहेत. यांचा देवावर अजिबात विश्वास नाही. देव देव करणाऱ्यांची ह्यांनी नेहमी खिल्ली उडवली आहे. ते देवच मानीत नाहीत. पण यांची पत्नी म्हणजे अर्धांगी ही देवभोळी आहे. एकदम आस्तिक, व्रतवैकल्य, उपासतापास, पूजापाठ वगैरे करण्यातच तिने आपले आयुष्य घालवले आहे. त्यामुळे ह्यांच्या गाठी पुण्य जमा नसलं तरी पत्नीचे, अर्धे पुण्य पतीला मिळते, या न्यायाने ते तिच्या अर्ध्या पुण्याचे हकदार आहेत.

यांच्या हिशेबात विशेष नोंद म्हणजे हे नास्तिक असले तरी ह्यांनी प्रत्येक कादंबरीच्या प्रकाशनाआधी व नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या आधी आरवलीच्या वेतोबाला प्रदक्षिणा घातल्या आहेत व फुलांचे हार पण घातले आहेत. वेतोबावर यांची पहिल्यापासून श्रद्धा व भक्ती आहे.' एवढं वाचून सेवक थांबतो.

दळवी चित्रगुप्ताच्या न्यायाची आतुरतेनं वाट बघत कान टवकारून उभे राहतात.

'दळवी स्वत: नास्तिक असले तरी पत्नीची अर्धी पुण्याई व वेतोबावरील श्रद्धा, भक्ती यामुळे त्यांची नरकात रवानगी न होता स्वर्गीच्या देवलोकांत रवानगी केली जात आहे. तेथे त्यांना त्यांच्या इतमामाप्रमाणे त्यांची सर्व व्यवस्था केली जाईल.' चित्रगुप्त योग्य तो न्यायनिवाडा जाहीर करतात.

आनंदित, उल्हासित झालेले दळवी हात जोडून म्हणतात, 'एक विनंती आहे, चित्रगुप्त साहेब. वेतोबांच्या प्रत्यक्ष दर्शनाची आशा पुरी करावी.'

'जरूर, जरूर, तुम्हाला प्रथम तिकडेच नेलं जाईल.'

वेतोबाच्या कक्षात आल्यावर दळवी ध्यानमग्न हात जोडून उभे. एकाएकी डोळे दिपवून टाकणारा प्रकाशझोत तिथं दळवींच्या सर्वांगावर पडतो. दळवी ध्यानमग्नच. 'जयवंता मी आलोय. तुझ्या भेटीची मलाही ओढ होती.' वेतोबा दळवींच्या पाठीवर हात ठेवतात. दळवी डोळे उघडतात. संभ्रमित, अवाक्‌पणे बघत राहतात. मी स्वप्नात तर नाही ना? हा भास तर नाही ना ! आरवलीचा वेतोबा खराखुरा समोर उभा राहिलेला पाहून ते स्वत:ला धन्य धन्य समजतात. त्याच्यापायी लोळण घेतात. 'उठ जयवंता, उठ मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. माझे आशीर्वाद तर नेहमीच पाठीशी होते तुझ्या. अरे तुझ्या नाटक, कादंबऱ्या इकडे आणल्यास की नाही वाचायला?' वेतोबा कौतुकानं पृच्छा करतात. 'जयवंता, तुझ्या प्रत्येक कादंबरीच्या प्रकाशनाला, नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला मला तू गळ घालायचास. मग सारी कामं टाकून मला हजर राहावं लागायचं तेथे. परवाचा तुझा सत्कार-सोहळा - न भूतो न भविष्यती असा पाहिलाय आम्ही. आपल्या भक्ताच्या कर्तृत्वाची ती विराट रसिकसभा पाहून आम्ही धन्य, कृतार्थ झालो.'

भांबावलेले, गोंधळलेले दळवी नम्रपणे उद्गारतात, 'नाटक, कादंबऱ्या इकडे आणायची इच्छा होती. पण इथे बरोबर पापपुण्याशिवाय काहीही आणायची परवानगी नाही ना म्हणून...' 'ठीक आहे, ठीक आहे, काही वाटून घेऊ नकोस त्याचं. प्रतिभा तर आणली आहेस ना बरोबर? इथे लेखन कर. आता तुला व्याधी, चिंता, कर्तव्यकर्म काहीही नाहीत. नुसतं लिहायचं, बस्स ! चित्रगुप्त ह्यांची नीट व्यवस्था करायला सांगा. काय हवं नको ते बघा. तिकडे जे काही लिहायचं मनात होतं, पण राहून गेलं (दळवींना मृत्यूची चाहूल लागली होती, त्यामुळे ते आपले

लेखन लवकर लवकर पूर्ण करण्याच्या मागे होते. पण तरीही ते पूर्ण होऊ शकलं नाहीच..) ते येथे लिही. तुझी उत्तम बडदास्त इथे ठेवली जाईल.' बेतोबा प्रसन्न होऊन बोलतात. दळवी पायाशी नतमस्तक.

बेतोबा अदृश्य होतात. दळवी डोळे उघडतात तर एका सुंदर, रमणीय बागेत एका वृक्षाखाली हिरवळीवर दळवी पहुडलेले असतात. सुंदर अप्सरा, मद्याची सुरई, लेखनाचे साहित्य वगैरे घेऊन सेवेसी सादर असतात. 'या इथे तरूतळी एक वही कवितेची' वगैरे ओळी त्यांना आठवतात. त्याची प्रत्यक्ष प्रचिती त्यांना येते. ते सुखावतात नि लेखन करायला सरसावतात. पृथ्वीवरील स्त्री-पुरुष संबंधावर आजवर मी अनेक नाटकं, कादंबऱ्या लिहिल्या. पण आता या स्वर्गातल्या मुक्त स्त्री-पुरुष संबंधावर बेधुंद, अनिर्बंध, सनसनाटी, पावरफुल लिखाण आता करायला घेतो. येथे अप्सरांच्या सहवासात स्त्री-पुरुष संबंधाचा आकंठ आस्वाद व सखोल अभ्यास करून स्वानुभवावर आधारित अस्सल, जिवंत, वास्तववादी, ज्वलंत अशा भावदर्शी कादंबऱ्या लिहितो, मग त्याची नाटकं बनवतो. मजा आहे.

'दळवी साहेब, इथं आता तुम्हाला कुठलाही त्रास होणार नाही, ते मरणान्तिक डायलिसिस वगैरे काहीही नाही. व्याधी, दैन्य, दुःख काहीच नाही. आतापर्यंत तुम्हाला काही त्रास जाणवला का पूर्वीसारखा ! सर्व व्यवस्था मनासारखी झाली ना? काही लागलं तर सांगा' दळवी स्वप्नातून जागं झाल्यासारखं वर बघतात, तर समोर चित्रगुप्त.

'चित्रगुप्त साहेब, व्यवस्था चांगली आहे. पण मला इथे माझ्या स्वर्गस्थ आप्तमित्रांना भेटता येईल का?' दळवी पृच्छा करतात. 'नाही दळवी साहेब, इथे कोणी कोणाला भेटायचं नसतं. प्रत्येकाचं ठिकाण इथे अनंत योजने दूर असतं. त्यामुळं इथे जो तो फक्त स्वतःचा असतो, स्वतंत्र असतो. इथे फक्त सुख भरभरून उपभोगायचं. प्रेम, मत्सर, राग, लोभ, दुःख इथे काही नाही. तुम्ही लिहीत राहा. कोणी तुम्हाला त्रास द्यायला येणार नाही, व्यत्यय आणणार नाही.'

'पण माझ्या कादंबऱ्या, नाटकांना पब्लिशर म्हणजे प्रकाशक वगैरे आहेत ना इथे ? नाटकांचे प्रयोग वगैरे होतील ना ? आणि माझ्या नव्या नाटक, कादंबऱ्या पृथ्वीवरच्या लोकांच्या निदर्शनास येतील ना? त्यांच्या हाती पडतील ना? हो म्हणजे त्यांना कळायला पाहिजे दळवी इथेही लेखन करताहेत म्हणून.'

'हो त्याची नका काळजी करू. पृथ्वीवर प्रत्येकाच्या पापपुण्याचा हिशोब ठेवायला आपली माणसं, वार्ताहर जात असतात सारखी. बरं येतो मी.'

'धन्यवाद'. दळवी पुन्हा नतमस्तक. मजा आहे इथे. मुख्य म्हणजे ते मरणप्राय डायलिसिस नाही. दुखणं काहीच नाही. नुसती लेखन समाधी लावायची. अप्सरांच्या सहवासात सुरापान अमृत. अमृत म्हणतात ते हेच. इथे सारं विनामूल्य. पैसा मिळवायची कटकट नाही. काही तापच नाही डोक्याला. आता एकच काय, हजारो कादंबऱ्या, नाटकं प्रसवतो. दुसरं कामच काय मला ! अस्सल अनुभवातून लिहिलेली माझी नाटकं, कादंबऱ्या बघाल तर काय बिशाद आहे कुणाची म्हणायची, की मराठी लेखकाचं अनुभवविश्व तोकडं असतं म्हणून ! लोक हो, आता वाट बघा माझ्या स्त्री-पुरुष संबंध या कधीच्या मनात खदखदणाऱ्या विषयावरच्या आगळ्या, वेगळ्या, खळबळजनक नव्या नाटक, कादंबऱ्यांची... 'जय वेतोबा'.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१०१४०

# पुस्तक परिचय

## 'ब्लास्फेमी'

'ब्लास्फेमी' म्हणजे ईश्वरनिंदा. आपल्या या पुस्तकात लेखिका तेहमिना दुर्रानी यांनी ईश्वराचे ज्याला प्रतीक मानले जाते अशा मौलवींची निंदा केली आहे. अतिशय रोखठोक भाषेत, कुठलीही भीती न बाळगता आपली कथा लिहिली आहे. कुणीही हे पुस्तक वाचले तरी त्या कथेचा परिणाम त्याच्या अंतर्मनावर झाल्याशिवाय राहात नाही.

कथा आहे एका मुसलमान कुटुंबातील मुलीची. जिची घरची परिस्थिती अतिशय गरीब आहे. ही मुलगी अजून वयातसुद्धा आलेली नाही, तरी पण तिला दुसऱ्या गावातल्या एका प्रसिद्ध अशा मौलवीच्या, बाबाच्या घरातून लग्नाची मागणी येते. हिची आई, आजूबाजूचा त्यांचा परिसर, त्यातील माणसे यांना खूप आनंद होतो. सगळे तिच्या भाग्याचा हेवा करतात, तिला खूपच भाग्यवान समजतात व काही दिवसांनी तिचे लग्न त्या मौलवीशी लावून दिले जाते.

त्या मौलवीची आधीची म्हणजे पहिली बायको जीव देऊन मेलेली असते, दुसरी वेडी असते व तिसरी ही. त्याची सर्व कामे करणे, त्याच्याकडे त्याचे आशीर्वाद घेण्यासाठी येणाऱ्या लोकांचे जेवायचे बघणे, इतर बरीच कामे तिला रोज बघावी लागतात, करावी लागतात. त्याच्या इच्छा सांभाळणे, त्याला काय हवे काय नको बघणे, त्याला राग न येऊ देणे हे करणे तिचे कर्तव्य आहे असे तो तिला रोज सांगत असतो. राग आल्यावर तो तिला जनावरांना आपण अशी वागणूक देणार नाही, अशा पद्धतीने तो तिला वागणूक देत असतो.

तेथे एक मोठी बाई त्या मौलवीबरोबर नेहमी असते व तिचे सर्व लक्ष या मुलीवर असते. त्यामुळे ही मुलगी अतिशय एकटी पडते व घाबरलेली असते.

तिला मुली होतात, मुलं होतात. त्या मौलवीचे अत्याचार वाढत जातात. तिच्या मते तो एक कामपिपासू माणूस आहे. बायकांना आपल्या काही इच्छा असतात यावर त्याचा विश्वास नाही. तो बायको, मुलगी अथवा इतर स्त्रिया यांकडे एकाच नजरेतून बघत असतो. त्यात तो आपल्या मुलीला पण सोडत नाही आणि आश्चर्याची बाब म्हणजे या लिंगपिसाट, कामेच्छू आणि क्रूर माणसाला लोकं ईश्वराचे प्रतीक मानतात व त्याची पूजा करतात.

तिचे पुढे काय होते? ती आपली व आपल्या मुलींची सुटका कशी करून घेते? तिची मुलं आपल्या वडिलांच्या पद्धतीनेच जातात का? इ. गोष्टी अतिशय समर्पक रीतीने मांडल्या आहेत. स्त्रीच्या मनातील होणारी आंदोलनं अतिशय सुंदररित्या दिली आहेत. वाचताना वाचक पूर्णपणे त्यात स्वत:ला विसरून जातो. त्याला चीड येते.

विशेषत: तेहमिना दुर्रानी यांनी ही गोष्ट जगाला सांगून खूप मोठे काम केले आहे, कारण ही अंशत: खरी गोष्ट आहे. हे काम खूप मोठे आहे, कारण ते धर्माशी संबंधित आहे. लोकांच्या नाजूक भावनांशी संबंधित आहे.

त्याचप्रमाणे भारती पांडे यांनी अतिशय सुंदर व सहज, सोप्या भाषेत त्याचे भाषांतर केले आहे. ओघवत्या भाषेमुळे कुठेही वाचकाचा रसभंग होत नाही. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायाचा, छळवणुकीचा राग असेल अशा लोकांनी हे पुस्तक वाचायलाच हवे.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | - | ब्लास्फेमी |
| लेखिका | - | तेहमिना दुर्रानी |
| अनुवाद | - | भारती पांडे |
| प्रकाशक | - | मेहता पब्लिशिंग हाऊस |
| मूल्य | - | १७५ रु. |

## कन्टेजन

कन्टेजन आणि संसर्गजन्य. आपल्या या पुस्तकात डॉ. रॉबिन कुक यांनी अनेक संसर्गजन्य रोगांबद्दल माहिती दिलेली आहे. जर एखादा अतिशय संसर्गजन्य रोग मोठ्या शहरात पसरला तर काय होऊ शकेल, त्याच्यावर कशाप्रकारे उपाय केला जाऊ शकेल, कोणी त्याच्यावरून फायदा उठवेल का? इत्यादी गोष्टी यात मांडल्या आहेत.

सर्वात प्रथम यात एक घटना दाखविली आहे. एक माणूस सूक्ष्मजीव शास्त्राचा अभ्यास करत असतो. ते सूक्ष्मजीव मिळविण्यासाठी तो कुठल्याही थराला जाऊ शकतो. तो एकदा टुंड्रा प्रदेशात जातो. तिथे त्याच्या मित्राला एक खाण खोदताना १८७२ सालाचे लोक मेलेली गुहा मिळते. हा माणूस आपल्या मित्राला बोलावून घेतो. तो या मेलेल्या माणसांच्या रक्ताचे नमुने घेऊन शहरात येतो. काही काळानंतर शहरातील एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये एका पेशंटचा मृत्यू होतो व ते प्रेत शवविच्छेदन करावला पाठविले जाते.

हे शवविच्छेदन एका वेगळ्या हॉस्पिटलमध्ये केले जाते. तिथे हे विच्छेदन 'जॅक' नावाचा माणूस करतो. त्या पेशंटची स्थिती इतकी वेगळी असते की याला कोणता रोग झालाय हे तिथे असलेल्या इतर डॉक्टरांना समजू शकत नाही. जॅक याला प्लेग झालाय असे सांगतो. तेव्हा सर्वजण त्याला वेड्यात काढतात. पण नंतर परीक्षणानंतर त्याला प्लेगच झाल्याचे समजते व जॅकचे कौतुक होते.

जॅक हे कसं झालं बघायला हॉस्पिटलमध्ये जातो. त्याला खूप आश्चर्य वाटलेलं असतं. कारण 'प्लेग'चा नायनाट होऊन ७२ वर्षे झालेली असताना एवढ्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये याचे विषाणू आले कसे? नंतर काही दिवसांतच अजून तीन प्रेते शवविच्छेदनासाठी येतात. त्यांना पण असाच संसर्गजन्य रोग झालेला असतो. त्याचे नाव 'ट्युलरेमिया.' अजून काही काळानंतर अशाच एका अतिसंसर्गजन्य रोगामुळे 'न्युमोनिया' मुळे १० ते १५ प्रेते शवविच्छेदनासाठी येतात. सर्व त्याच मोठ्या हॉस्पिटलचे पेशंट असतात. जॅकने सर्व रोगांचे निदान पूर्वीच केलेले असते.

रोगांची वाढ होतच जाते. एवढे भयंकर व संसर्गजन्य विषाणू आले कसे, हा प्रश्न जॅकबरोबर सर्वांनाच पडतो. जॅक याचा शोध घेण्यासाठी त्या हॉस्पिटलमध्ये जातो. पण त्याला तिथे कोणीच दाद देत नाही किंवा माहिती सांगत नाही. एक डॉक्टर माहिती द्यायला जाते, पण तिचा रात्रीच खून होतो व जॅकला मारायला मग माणसे सोडली जातात.

असे का होते? कोणीतरी मुद्दामहून हे करते काय? इ. प्रश्न वाचकांना पडतात. अतिशय सुंदर भाषेत व शेवटपर्यंत वाचक पुस्तक हातातून सोडत नाही. इतक्या सुंदरतेने हे पुस्तक लिहिलेले आहे. वाचकाला जरी रोगांबद्दल माहिती नसली तरी त्याबद्दल इतकी तपशीलवार माहिती दिली आहे की वाचकाला ते कळतात.

अतिशय सुंदर, चांगल्या शब्दात हे पुस्तक लिहिले आहे. वाचक अगदी उत्कंठतेने शेवटपर्यंत हे पुस्तक वाचतो. रहस्य, थरार, उत्कंठा, आश्चर्य अशा संमिश्र भावना हे पुस्तक वाचून झाल्यावर वाचकाच्या मनात उठतात.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | - | कन्टेजन |
| लेखकाचे नाव | - | डॉ. रॉबिन कुक |
| अनुवाद | - | डॉ. प्रमोद जोगळेकर |

दोन्ही परिचय - **स्मृती म. जोशी**

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

# स्त्री स्वातंत्र्य : किती खरे? किती खोटे ?

*नाशिक येथील आनंद कांडक स्पर्धेत सादर केलेल्या वक्तृत्वाच्या विषयावर आधारित - संपादक*

भारत सरकारने पुरुषांइतकेच स्वातंत्र्य स्त्रियांनाही दिलेले आहे. स्त्रियांच्या उन्नतीसाठी बारावीपर्यंत मोफत शिक्षण, सवलती इ. गोष्टी विसरून चालणार नाहीत. कार्यक्षेत्रात मिळालेल्या स्वातंत्र्यामुळेच किरण बेदीसारखी महिला पोलीस अधिकारी होऊ शकली. सानिया मिर्झासारखी नवोदित टेनिसपटू, तिला जर तिच्या घरच्यांनी टेनिस खेळण्याचं स्वातंत्र्य दिलंच नसतं तर तिला विम्बल्डनसारखी स्पर्धा जिंकताच आली नसती. आज स्त्रीचा स्वाभिमान कमी होऊ नये म्हणून सरकारने असा निर्णय घेतला आहे की, बलात्काराच्या सुनावणीच्या वेळी असे प्रश्न विचारू नयेत की ज्यामुळे स्त्रीच्या मर्यादेला, अस्मितेला धक्का पोहोचेल. म्हणजेच हा निर्णय देऊन सरकारने स्त्रियांना विश्वासाने आणि ताठ मानेने जगण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. गेल्या दहा वर्षांत भारतीय स्त्रीने जगाला ६ मिस वर्ल्ड आणि मिस युनिव्हर्स दिलेल्या आहेत. म्हणजेच आज विचार केला तर सौंदर्यदर्शनाचे स्वातंत्र्य, नैतिकता भारतीय समाजाने दिलेली आहे.

बऱ्याचदा असाही मुद्दा उपस्थित केला जातो की, पालक मुलींना उशीरापर्यंत बाहेर न राहण्याचे बंधन घालतात, पण आपण पालकांचीही बाजू लक्षात घेतली पाहिजे. रिंकू पाटील, अमृता देशपांडे ही उदाहरणं सर्वांनाच माहिती आहेत. त्यामुळे पालकांना साहजिकच काळजी वाटते; म्हणून आपली मुलगी सुरक्षित राहावी यासाठी तिला उशिरापर्यंत बाहेर न राहण्याचं बंधन हे घातलं जातं. पण हे बंधन जर आपल्याला पारतंत्र्य वाटत असेल, तर आपण चुकतो आहोत असं म्हणावं लागेल. यासाठी मला एक उदाहरण द्यावंस वाटतं, पतंग जेव्हा उंच भरारी घेतो, तेव्हा त्याची भरारी ही दोऱ्यावरती अवलंबून असते. पण काहींना वाटतं की दोरा पतंगाला उंच भरारी घेण्यापासून रोखतो आहे आणि या संभ्रमात आपण जर दोराच कापून टाकला तर पतंग जमिनीवरच आदळणार आहे हे मात्र विसरतो. म्हणजेच स्वातंत्र्याला पालकांच्या योग्य बंधनाची जोड नसेल तर आजची एकूण परिस्थिती लक्षात घेता होणारं नुकसान खूप मोठं असेल. म्हणूनच Prevention is better than cure या तत्वानुसार काळजी घेणं हे अधिक योग्य आहे आणि काळजी घेणं हे पारतंत्र्य नाही असं मला वाटतं.



आतापर्यंत आपण नाण्याची एकच बाजू पाहिली. पण स्त्री स्वातंत्र्य समाजाने कितपत देऊ केलेले आहे हे पाहण्याचीसुद्धा गरज भासते. आताच आपण काळजीबद्दल बोललो. काळजी ही एका मर्यादेपर्यंत योग्य असते. काही पालक आपल्या मुलीला बरोबर सुई, मिरचीची पूड अशा वस्तू ठेवण्याची सक्ती करतात. पण पालक हे विसरतात की त्यामुळे मुलींच्या मनात भीती, द्वेष निर्माण होतो. या गोष्टींचा सल्ला देण्यापेक्षा पालकांनी मुलींना ज्युडो-कराटेचं प्रशिक्षण दिलं तर त्या नक्कीच आपलं आत्मसंरक्षण करू शकतात. पण आपला समाज वर्षानुवर्षे झापडं लावून बसलेला आहे. त्याचा कल आत्मनिर्भयतेकडे, आत्मसंरक्षणाकडे कधीच दिसत नाही. याउलट चीन, जपानसारख्या देशांत ९०% मुली ज्युडो-कराटेचं प्रशिक्षण घेतात.

जगाचा विचार केला असता आजही काही देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाही. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही कुठल्याही स्त्रीला राष्ट्रप्रमुख होण्याचा हक्क नाही. २००३ चे नोबेल

पुरस्कार आताच जाहीर झाले, त्यात शांतता पुरस्कारासाठी इराणच्या पहिल्या महिला वकील शिरीन इबादी यांची निवड करण्यात आली. १९७० साली जेव्हा जज् म्हणनू त्यांची निवड करण्यात आली तेव्हा इराणमधल्या पुरुषवादी समाजाने त्यांच्या पदावर आक्षेप घेतला आणि नाइलाजाने त्यांना हे पद सोडावे लागले. एखाद्या स्त्रीच्या स्वातंत्र्यावर, नेतृत्वगुणावर झालेल्या अन्यायाचे कदाचितच यापेक्षा मोठे उदाहरण असेल. पण त्याच शिरीन इबादींनी जज् पद सोडल्यापासून आजपर्यंत स्त्रियांच्या अधिकारासाठी लढा दिला आणि त्याचेच फलित म्हणून त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. म्हणजेच स्त्रीला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, अधिकारासाठी झटावं लागतं हे आपल्या लक्षात येईल.

आपल्या देशात स्त्रियांना मतदानाचा अधिकार आहेच, त्याचबरोबर राष्ट्रपती, पंतप्रधान होण्याचाही अधिकार आहे. याआधीच आपल्याला इंदिराजींसारखं कुशल नेतृत्व लाभलं. आज आपल्या देशात ५ महिला मुख्यमंत्री आहेत, तसेच संसदेने स्त्रियांना ३३% आरक्षण दिले आहे. पण मित्रांनो, मला एक प्रश्न खूप दिवसांपासून सतावतो आहे की, मायावती जेव्हा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री होत्या तेव्हा राज्यात १,६२,२०० मुलींना जन्म घेण्याच्या आधीच मारण्यात आले, त्या स्त्रियांचा मनाविरुद्ध गर्भपात करण्यात आला. ज्या राज्याची मुख्यमंत्री स्त्री आहे, त्याच राज्यात इतके गर्भपात होत असतील, तर मग या ३३% आरक्षणाचा, स्वातंत्र्याचा काय फायदा ?

स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारं नवं स्वरूप म्हणजे Women's Exploitation at work place अर्थातच स्त्रिया जिथे काम करतात तिथे त्यांना नव-नवीन प्रश्नांना सामोरं जावं लागतं. एखाद्या कार्यालयातील स्त्रीला तिच्या योग्यतेवर जर प्रमोशन मिळालं तर ते प्रमोशन तिच्या योग्यतेवर अवलंबून नसून इतर मार्गांनी मिळवलेलं आहे, असा समज आज दिसून येतो. मग त्या स्त्रीला टोमणे मारणं, तिचा मानसिक छळ करणं असे प्रकार आज सर्रास घडत आहेत.

माफ करा, पण स्त्रियांच्या स्वातंत्र्याला अडथळा काही प्रमाणात स्त्रियाच असतात. आपल्या मुलीला चांगली वागणूक देणारी आई जेव्हा सासू बनते, तेव्हा तिचं मातृत्व कुठे जातं? हुंड्यासाठी केला जाणारा छळ, लादली जाणारी जाचक बंधनं हे आपल्या समाजातलं भयानक दृश्य आहे. आपल्या देशात स्त्री हक्क संघटना या शेकडोंनी आहेत. पण एखाद्या स्त्रीवर जेव्हा बलात्कार होतो किंवा तिच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जातो तेव्हा या स्त्री संघटना काय करत असतात? बलात्कार करणारा शिक्षा होईपर्यंत मोकाट फिरत राहतो, पण जिच्यावर बलात्कार होतो तिला मात्र समाजाकडून आणि स्त्रियांकडूनसुद्धा अपमानास्पद वागणूक दिली जाते. (ताजंच उदाहरण द्यायचं झालं तर दिल्लीत जेव्हा राष्ट्रपतींच्या अंगरक्षकाने एका मुलीवर बलात्कार केला तेव्हा याविरोधात देशातील कोणत्याही स्त्री संघटनेला निषेध का करावासा वाटला नाही? त्यामुळे आज या प्रकरणाची कितपत तपासणी झाली हे कोणालाच माहीत नाही.) स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल जर स्त्रियांनाच जाणीव नसेल तर या विषयावर चर्चा करण्यात काहीच उपयोग नाही.

खरं सांगायचं झालं तर आपल्याला स्त्री स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय ते कळलेलंच नाही. स्त्री स्वातंत्र्याबद्दल समाजात, विशेषत: तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरसमज आहेत. आज तरुण मुलींना तोकडे कपडे घालणं, विविध डेज् साजरे करणं, पबमध्ये जाऊन नाचणं, दारू पिणं म्हणजे स्वातंत्र्य वाटू लागलेलं आहे आणि इथेच आपण चुकतो आहोत. कारण नीतिमत्ता, संस्कृती सोडून कोणत्याही प्रकारचं स्वातंत्र्य मिळवता येत नाही. आज जर समाजात 'जॉगर्स पार्क' किंवा 'छोटीसी लव्ह स्टोरी' सारखं स्वातंत्र्य रंगणार असेल तर असं स्वातंत्र्य आम्हाला मुळीच नकोय. आज चित्रपटांद्वारे, जाहिरातींमध्ये, अल्बममध्ये स्त्रियांचे

जे देहदर्शन दाखवलं जातं त्याने समाजात विकृती निर्माण होते आहे आणि कदाचित वाढत्या बलात्काराचं हेच कारण आहे. मग समाजाला 'काँटा लगा' हे जर स्त्री स्वातंत्र्य वाटत असेल तर त्या स्वातंत्र्यावर बंधनं ही घातलीच पाहिजेत.

आपल्याला जर खऱ्या अर्थाने स्त्री स्वातंत्र्य घडवून आणायचे असेल तर मुलींना आत्मनिर्भर बनवा, पण त्याचबरोबर मुलांबरही संस्कार करा. कारण बलात्कार करणाऱ्याचीसुद्धा आई असते आणि आईनंच जर या बलात्कार करणाऱ्या मुलाविरूद्ध आवाज उठवला तरच खऱ्या अर्थाने स्त्री स्वातंत्र्य होऊ शकेल. देवाने ही सुंदर पृथ्वी निर्माण केली आणि तिला आकार देण्यासाठी आई, बहीण, मुलगी, पत्नी अशी नाती निर्माण केली. त्याचं ऋण फेडणं मला कदापि शक्य नाही. पण जाता जाता 'माँ तुझे सलाम' एवढंच म्हणतो आणि माझं बोलणं संपवतो. धन्यवाद !

– गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉलजवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ ९५१९

सन्माननीय सदस्य मित्रांनो,
डिसेंबरच्या अंकाबरोबर बऱ्याच जणांची वर्गणी संपत आहे.
२००४ साठी आपल्या वर्गणीचे नूतनीकरण करून सहकार्य करावे.
– कार्यकारी संपादक

## विनम्र आठवण

**गेल्या वर्षात ज्यांचे निधन अस्वस्थ करून गेले अशा महान कर्तृत्ववानांची विनम्र आठवण.**

| | | |
|---|---|---|
| जानेवारी | ७ - | गुरुवर्य स.वि. कुलकर्णी |
| | १८ - | हरिवंशराय बच्चन |
| मार्च | १४ - | सुरेश भट |
| एप्रिल | ३० - | वसंत पोतदार |
| मे | १० - | म.पां. भावे |
| | २ - | डॉ. नीतू मांडके |
| | २९ - | दुर्गाबाई भागवत |
| | ३१ - | अनिल विश्वास |
| जुलै | ३ - | स्नेहलता दसनूरकर |
| | ११ - | भीष्म सहानी |
| | | सुहास शिरवळकर |
| सप्टेंबर | २८ - | डॉ. सुरेश नाडकर्णी |
| | | मो. ग. तपस्वी |

*घर माझे शोधाया मी वाऱ्यावर वणवण केली*
*जे दार खुले दिसते ते आधीच निखळले होते*
*मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो*
*मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते.*

– सुरेश भट

# परिसर वार्ता

## मुंबई विद्यापीठ व जोशी-बेडेकर महाविद्यालय आयोजित आंतरविभागीय राष्ट्रीय पुरुष खो-खो स्पर्धेत मुंबई विद्यापीठ अजिंक्य

सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचवणाऱ्या या अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठ विरुद्ध शिवाजी विद्यापीठ या अटीतटीच्या व चुरशीच्या सामन्यात यजमान मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचा २ गुणांनी पराभव करून या आंतरविद्यापीठ व आंतरविभागीय राष्ट्रीय स्तरावरील खो-खो स्पर्धेचे मानाचे अजिंक्यपद पटकावले आणि प्रेक्षकांची वाहव्वा मिळवली, ती मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्याच उपस्थितीत ! मुंबई विद्यापीठाच्या खो-खो संघाने हा चषक पटकावून डॉ. मुणगेकरांना एक अनमोल भेट बहाल केली.

या अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठातर्फे अमित मांडवकरने १.५० मि. संरक्षण करून ३ गडी बाद केले. शेखर पाटीलने २.४० मि. संरक्षण करून १ गडी बाद केला, तर प्रशांत गावकरने १.४० मि. संरक्षण करून ३ गडी बाद केले. शिवाजी विद्यापीठातर्फे सुनील चव्हाणने १.४० मि. संरक्षण करून ३ गडी बाद केले, तर अमित नवालेने २.३० मि. संरक्षण करून १ गडी बाद केला, तर सुनील कुचेकरने १.५० मि. संरक्षण करून २ गडी बाद केले आणि मुंबईला चांगली झुंज दिली. त्यामुळे मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातील हा सामना खरोखर संस्मरणीय ठरला.

तिसऱ्या क्रमांकासाठी खेळल्या गेलेल्या सामन्यात गतविजेत्या पुणे विद्यापीठाने म्हैसूर विद्यापीठाचा २ गुण आणि १ मि. (१६-१४) राखून पराभव केला आणि या स्पर्धेत गतविजेत्या पुणे विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळवला. पुणे विद्यापीठाच्या राहुल जोशीने १.५० मि. संरक्षण केले. तर तुषार चित्रावने १.१० मि. संरक्षण करून ४ गडी बाद केले आणि उमेश देवधरने १.१० मि. आणि २ मि. संरक्षण करून १ गडी बाद केला, तर म्हैसूर विद्यापीठातर्फे १.३० मि. संरक्षण करून आर. किरणने एकूण ५ गडी बाद केले, सी. पी. आदर्शने २.५० मि. व १.२० मि. संरक्षण करून १ गडी बाद केला, तर एच. एल. हरीशने १ मि. व १.४० मि. संरक्षण करून २ गडी बाद केले.

अशा तऱ्हेने या स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, शिवाजी आणि पुणे विद्यापीठाने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून या स्पर्धेवर पूर्णपणे महाराष्ट्राचा ठसा उमटवला. या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाचा अमित मांडवकर 'अष्टपैलू खेळाडू' आणि प्रशांत गावकर 'सर्वोत्कृष्ट आक्रमक' आणि शिवाजी विद्यापीठाचा अमित नवाले, 'सर्वोत्कृष्ट संरक्षक' ठरला.

## डॉ. श्रीमती मुळगावकर

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीमती मेधा मुळगावकर



८ ते १० ऑक्टोबर २००३ च्या दरम्यान लखनौ येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत सहभागी झाल्या होत्या. लखनौ विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या या परिषदेचा विषय 'बायोडायव्हरसिटी अँड अप्लाइड बायोलॉजी ऑफ प्लांटस्' हा होता. डॉ. मुळगावकर यांनी 'पोलन अॅनॅलिसिस ऑफ सम स्पिशिज् ऑफ जीनस् अेअराइडस् लोअर फ्रॉम महाराष्ट्र' या विषयावरील आपला शोधनिबंध सादर केला.

### बांदोडकर मंडळ आकांक्षाचे उद्घाटन

सांस्कृतिक मंडळाच्या आकांक्षाचे २५ नोव्हेंबर रोजी उद्घाटन झाले. प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, उपप्राचार्य म.ह. दीक्षित आणि इतर शिक्षकवर्ग उपस्थित होता. विद्यार्थ्यांनी शारदेचे स्तवन केले.

समितीच्या सदस्यांची तसेच इतर समित्यांचे सभासद यांचे विद्यार्थ्यांतर्फे हार्दिक स्वागत झाले. विद्यार्थ्यांमधील सर्वांगीण विकासात्मक गुणांचा मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. यामध्ये सुगम संगीत आणि काही नृत्यं सादर केली गेली. प्रेक्षकवर्ग नृत्यांच्या जल्लोषात मग्न झाला होता.

नकलाकारांचे हास्यविनोद हे या कार्यक्रमाचे आकर्षण होते. यानंतर कार्यक्रमाची सांगता चहा-पाण्याने होऊन सर्वांचे आभारप्रदर्शन झाले.

### गीतेश शिंदे यांचे अभिनंदनीय यश

'विसावा' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानिमित्त 'मुंबई नागरिक समिती' तर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या गीतेश शिंदे यास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. गीतेशचा या सोहळ्यात माजी गृहमंत्री आणि शिवसेनेचे आमदार श्री. बाळा नांदगावकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी 'कुटुंब रंगलंय काव्यात' या कार्यक्रमाचे सादरकर्ते श्री. विसूभाऊ बापटदेखील उपस्थित होते. या काव्यलेखन स्पर्धेत राज्यभरातून १४० स्पर्धक सहभागी झाले होते.



गीतेश शिंदे

तसेच साहित्य संघातर्फे घेण्यात आलेल्या पहिल्या महाविद्यालयीन साहित्य संमेलनातदेखील काव्यवाचनासाठी गीतेशची दहा कवींत निवड करण्यात आली होती. गीतेशला साहित्य प्रांतात यापूर्वीही कविवर्य नारायण सुर्वे, कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते विविध स्पर्धांत पारितोषिके मिळाली आहेत.

### तनेशाचे यश

बांदोडकर महाविद्यालयात तृतीय वर्ष (रसायनशास्त्र) या वर्गातील तनेशा या विद्यार्थिनीस भांडुप येथील रत्नम महाविद्यालयांत झालेल्या आंतर-महाविद्यालयीन सेमिनार स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. २२ नोव्हेंबर रोजी झालेली सदर स्पर्धा रत्नम महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या रसायनशास्त्र मंडळातर्फे आयोजित करण्यात आली होती.



तनेशा

ऑगस्टमध्ये तनेशाला वझे महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या रसायनशास्त्र मंडळाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. या दोन्ही यशांबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. स. ग. मेढेकर यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

### जोशी-बेडेकर, ठाणे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे वैद्यकीय परीक्षण शिबीर

ठाण्यात प्रथमच जोशी-बेडेकर, ठाणे महाविद्यालयात विद्यार्थीवर्ग, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी महाविद्यालयातील प्रथमोपचार केंद्रातर्फे दिनांक २४/११/२००३ ते २५/११/२००३ पर्यंत वैद्यकीय शिबीर आयोजित करण्यात आले. या वैद्यकीय





शिबिराचे आयोजक तसेच प्रथमोपचार केंद्रप्रमुख प्रा. दीपक सावळे असून त्यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम करण्यात आला. तसेच, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स.वा.गोखले, उपप्राचार्य श्री. ए.एस्. वडगुजर व उपप्राचार्या सौ. शोभा दोशी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स. वा. गोखले यांनी केले. या उपरोक्त कार्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथील तज्ज्ञ डॉक्टरांचे मोलाचे सहाय्य मिळाले. डॉ. गुरव आर. बी., डॉ. आदिती हाजिरनीस, डॉ. मनीषा बावडेकर, डॉ. प्रसाद कांदळगांवकर आणि डॉ. राहुल जाधव यांची उपस्थिती लाभदायक ठरली. तसेच यावेळी महाविद्यालयातील प्रा. अनिल भावड, प्रा. मोरे, प्रा. डिसोजा, प्रा. बारसे, प्रा. पाटील, प्रा. सौ. नटराजन व प्रा. सौ. बाळुजकर उपस्थित होते.

## बांदोडकरमधील शैक्षणिक सहल

विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक सहल यंदा हिमाचल प्रदेशात जाऊन आली. ही शैक्षणिक सहल २८ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या १० दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या सहलीचे आयोजन प्रा. डॉ. सौ. पेजावर, प्रा. डॉ. सौ. पाटील, प्रा. डॉ. सौ. बोरकर व प्रा. पारिया सर या शिक्षकांनी केले होते. प्राणिशास्त्र विभागाचे एकूण सत्तावीस (२७) विद्यार्थी या सहलीला आले होते.

२८ ऑक्टोबरला रात्री ११ वाजता दादर-अमृतसर-दादर या गाडीने सहलीची सुरुवात झाली. आम्ही ३० ऑक्टोबरला सकाळी ९.३० वाजता अंबाल्याला पोहोचलो. येथून आम्ही रेणुकाजीसाठी रवाना झालो.



रेणुकाजी सँक्च्युरीतील एक छायाचित्र

या सहलीत आम्ही रेणुकाजी, चैल, गोविंदसागर, कुलू-मनाली अशा विविध ठिकाणांना भेट दिली. सर्व ठिकाणे हिमाचल प्रदेशातील वेगवेगळ्या भौगोलिक ठिकाणी आहेत. हिमाचलचे भौगोलिकदृष्ट्या चार विभाग आहेत असे - बियास खोरं (मनाली), सतलज खोरं (रेणुकाजी, विलासपूर), धवलगिरी खोरं (हिमशिखरे)

आणि ट्रायबल खोरं. या विविध भागांतील वेगवेगळी अभयारण्ये व राखीव जंगले आम्ही पाहिली. (३० ऑक्टो.) रेणुकाजी येथे रेणुकामातेचे मोठे तळे आहे. त्या तलावाच्या भोवतालच्या डोंगरांवरचे जंगल राखीव ठेवण्यात आले आहे. येथे आम्हाला घुरल, बार्किंग डिअर, काळवीट, सांबर हे प्राणी बघता आले. रेणुकाजी तलावात आम्ही कार्प, ईल, महसीर असे विविध प्रकारचे मासे पाहिले. रेणुकाजीला संध्याकाळी आम्ही पक्षीनिरीक्षणही केले. तेव्हा भारतीय मूर हेन, जांभळी मूर हेन, कूट, शॉवलर असे पाणपक्षी व धनेश, वटवाघुळे, ट्री पाय हे पक्षी पाहिले. (१ नोव्हेंबर) 'चैल' हे ठिकाण घनदाट सूचीपर्णी वृक्षराजीने नटलेले आहे. लहानमोठ्या डोंगररांगा सर्वदूर पसरलेल्या होत्या. येथे आम्ही हुप्या (काळ्या तोंडाची माकडे), सोनेरी पाठीची माकडे पाहिली. येथेच आम्ही जगातील सर्वात उंचावरचे क्रिकेट मैदान पाहिली (उंची ७५०० फूट)



निसर्ग निरीक्षण

(२ नोव्हें.) बिलासपूर येथे आम्ही 'गोविंदसागर' हा मोठा तलाव पाहिला. येथे सकाळी आम्ही पक्षीनिरीक्षण केले. विविध प्रकारचे खंड्या पक्षी, पाँडहेरॉन, बगळे, सँड पायपर, सुतार पक्षी, वॅगटेल, हिमालयातील पोपटांचे प्रकार, घुबड, पॅराडाइज फ्लाय कॅचर, कबुतरे व विविध फुलपाखरे, भारद्वाज, कॉरमोरंट.

प्रवासातही आम्ही विविध पक्षी पाहिले. सातभाई, व्हाइट चिक् बुलबुल, रेड वेंटेड बुलबुल, गरूड, पोपट, टिटवी, कश्मिरी रोलर इ.

(३ व ४ नोव्हें.) कुलू-मनाली हे ठिकाण पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. येथील पर्वतराजी सूचीपर्णी वृक्षांनी बहरलेली आहे. दूरवर दिसणारी हिमाच्छादित शिखरे आपल्याला साद घालतात. येथील प्रसिद्ध हिडिंबा मातेचे मंदिर व हिडिंबा माता यांचे आम्ही दर्शन घेतले. तसेच तिबेटीयन संस्कृतीच्या बुद्धमंदिरातही आम्ही जाऊन आलो.

मनालीत आम्हाला हिमालयन व्हिसलिंग बर्ड, ब्लॅक बर्ड, जंगली कावळा इ. पक्षी दिसले. याच दिवशी आम्ही 'रोहतांगपास' या पर्वतराजीवर बर्फाची मजा लुटण्यास गेलो होतो. अशा दुर्गम भागात निसर्ग आपले रूप कसे क्षणाक्षणाला पालटतो, याचा दाखला मिळाला. काही वेळापूर्वी सूर्यात तळपणारी शिखरे बघता-बघता बर्फांनी भरून गेली, जोराचे गार-गोठवून टाकणारे वारे सुरू झाले. हे सर्व अनुभवताना फारच मजा आली. आम्हाला येथे याकही बघता आला.

एकूणच ही शैक्षणिक सहल आम्हा सर्वांसाठी जितकी अभ्यासपूर्ण तितकीच आठवणीत राहील अशी होती.

-सुखदा कुलकर्णी

तृतीय वर्ष (प्राणिशास्त्र), बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**डॉ. टेकाळे व अनिकेत दफ्तरदार जिनेवास रवाना**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील डॉ. नागेश टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणारा महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी अनिकेत दफ्तरदार व स्वत: नागेश टेकाळे हे (WHO) ने संयोजित केलेल्या परिषदेसाठी



अनिकेत दफ्तरदार

जिनेवाला रवाना झाले. या परिषदेत ते बिटा-कॅरोटीन या संशोधनावर आधारित शोधनिबंध सादर करणार आहेत. अनिकेत दफ्तरदारने बिटा-कॅरोटीनवर व त्यापासून निर्माण होणाऱ्या विविध २२ ओरीजिन्सवर थोडक्या वेळात संशोधन केले. बिटा-कॅरोटीन हे विविध प्रकारच्या भाज्यांमध्ये आढळते व ते एक प्रकारचे अँटीऑक्सिडंट आहे. या द्रव्याचे कमी किंमतीत व्यावसायिक उत्पादन करणे, या संबंधात हे संशोधन आहे. शरीरात व्हिटॅमिन 'ए' तयार होण्यासाठी आहारात बीटा-कॅरोटीन असावे लागते. त्यामुळे ग्लायकोमा व मायो-पिया तसेच डोळ्यांच्या संदर्भातील इतर आजार इ. नियंत्रणात राहतात. डॉ. नागेश टेकाळे व अनिकेत दफ्तरदार यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील सहभागाबद्दल विद्या प्रसारक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले.

## तंत्रनिकेतन वार्ता

ग्रंथालयातील स्टाफसाठी विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात २९ नोव्हेंबर, २००३ रोजी ३ ते ५ या वेळात तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयात एक कार्यशाळा आयोजित केली होती.

या कार्यशाळेत श्री. बारसे - ग्रंथपाल जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय यांनी 'ग्रंथालयाचे कामकाज व त्याचे महत्त्व' याविषयी आपले विचार मांडले. तसेच बी.एन्. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. पाठक यांनी ग्रंथालयातील तंत्रज्ञान व त्याचा ग्रंथालयातील कामकाजात होणारा वापर याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी तंत्रनिकेतनातर्फे ही कार्यशाळा प्रथमच आयोजित केली होती. या कार्यशाळेस तंत्रनिकेतनातील ग्रंथालयातील स्टाफ श्री. बोरसे, श्री. शिंगाडे, श्री. वारगोडे, श्री. पाटील, श्री. जाधव, श्री. लाहोट हे उपस्थित होते. तसेच बी. एन्. बांदोडकर महाविद्यालयातील ग्रंथालयातील श्री. ललित, श्री. ओरेकर, श्री. खापरे, श्री. गोडबोले तसेच मॅनेजमेंटच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सौ. दीपाली हिंदळेकर याही उपस्थित होत्या.

तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयाच्या इनचार्ज सौ. वी. ए. जोशी यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. त्यात त्यांनी असे सांगितले की, प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

प्राचार्य श्री. मुजुमदार यांच्या हस्ते श्री. बारसे व श्री. पाठक यांना तंत्रनिकेतनातर्फे छोटी भेटवस्तू देण्यात आली. यावेळी प्राचार्य श्री. मुजुमदार म्हणाले की, कॅम्पसमधील सर्व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी उपयोग होईल असे कार्यक्रम आयोजित करावेत.

### जोशी-बेडेकर महाविद्यालयात नॅक

नॅकची पीअरटीम आमच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात २७ व २८ डिसेंबर रोजी येत आहे. त्या निमित्ताने महाविद्यालयात जोरात तयारी चालू आहे. निरनिराळ्या समित्यांच्या बैठका, महाविद्यालयाच्या इमारतीचे नूतनीकरण झपाट्याने चालू आहे. विशेष म्हणजे ग्रंथालयाचे संपूर्ण नूतनीकरण केले जात आहे. नवीन ग्रंथालयाची रचना पूर्णत: प्रा. बारसे यांनी सांगितल्यानुसार केली जात असल्याने ग्रंथपालाला ग्रंथालय रचनेच्या कार्यात सहभाग मिळाला आहे. दूरदर्शीपणे बारसे यांनी केलेला आराखडा विशेष आहे. ग्रंथपालाला एकूण प्रक्रियेत दिले जाणारे महत्त्व खास लक्षात घ्यावे असे आहे.

- संकलित